# मेहता मराठी ग्रंथजगत

एप्रिल, २०२४
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष चोविसावे
अंक चौथा


## द.मा.मिरासदार

जयंती : १४ एप्रिल, १९२७ । स्मृतिदिन : २ ऑक्टोबर, २०२१

सरमिसळ
गुदगुल्या
सुट्टी आणि इतर एकांकिका
गाणारा मुलख
भुताचा जन्म
चकाट्या
गप्पागोष्टी
गप्पांगण
जावईबापूंच्या गोष्टी
गोष्टीच गोष्टी
चुटक्याच्या गोष्टी
भोकरवाडीतील रसवंतीगृह
भोकरवाडीच्या गोष्टी
विरंगुळा
खडे आणि ओरखडे
फुकट
अंगतपंगत
माझ्या बापाची पेंड
बेंडबाजा
मी लाडाची मैना तुमची
हसणावळ
नावेतील तीन प्रवासी
हुबेहूब
माकडमेवा
गंमतगोष्टी



## साहित्य पुरस्कारासाठी आवाहन



'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'** देण्यास सुरुवात झाली. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत करण्यात आली होती.

या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

# 'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**
**₹ ३०,०००/-**

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**
**₹ २०,०००/-**



### पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

- १ जानेवारी, २०२४ ते ३० सप्टेंबर, २०२४ दरम्यान प्रकाशित झालेली लेखकाची पहिली कादंबरी किंवा कथासंग्रह या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.
- अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख : १ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत
- पात्र इच्छुकांनी पुस्तकाची एक प्रत, संपूर्ण परिचय, संपूर्ण माहिती (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक) आणि फोटो दिलेल्या पत्त्यावर पाठवावे.

या पुरस्काराची घोषणा जानेवारी २०२३ मध्ये केली गेली असून १२ जानेवारी, २०२५ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ एप्रिल २०२४ ◆ वर्ष चोविसावे ◆ अंक चौथा

**संपादक**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य**
प्रतीक येतावडेकर

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाइन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

***मेहता पब्लिशिंग हाऊस***

*— अनुक्रमणिका —*

| | |
|---|---|
| **संपादकीय** | **४** |
| **वितरकाच्या नजरेतून** | **१०** |
| **पुस्तकांच्या पानांतून** | |
| द रॅकेटिअर | १२ |
| अस्तित्वाचा उत्सव | २० |
| शार्लटन्स | २६ |
| समर्थ | ३४ |
| स्मृतियात्रा | ४२ |
| सूर भरला अंतरी | ५० |
| **अभिप्राय** | **५८** |
| **दिनविशेष** | **६२** |

संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ I E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.



# संपादकीय

## मराठी विनोदी साहित्यातील मिरासदारी...

एकोणिसशे साठ सालानंतर जी पिढी लिहिती झाली ती प्रामुख्याने महाराष्ट्राच्या ग्रामीण भागांतील होती. व्यंकटेश माडगूळकर, रणजित देसाई, शंकर पाटील, द. मा. मिरासदार, अण्णा भाऊ साठे, वामन चोरघडे ही त्यांतील प्रातिनिधिक नावे. या साहित्यात स्वातंत्र्योत्तर ग्रामीण समाजजीवनाच्या भावभावनांचे, नव्या व्यवस्थेशी जुळवून घेताना होणाऱ्या संघर्षाचे चित्रण पाहायला मिळते. ग्रामीण जीवनातील समाजमनाचा ठाव घेणारे हे अस्सल साहित्य. म्हणून या लेखनाची भुरळ तत्कालीन नागर तसेच ग्रामीण भागांतील वाचकांना यानिमित्ताने पडलेली पाहायला मिळते. ग्रामीण व दलित साहित्य यांची समांतर वाटचाल साठच्या दशकात सुरू झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची लिहिती झालेली ही पिढी नंतर मराठी वाचकांच्या गळ्यातील ताईत बनली. आजही त्यांनी लिहिलेले साहित्य त्याच उत्सुकतेने वाचले जाते.

'नवकथा' व 'नवकविता' यांच्या बहराचा हा काळ होता. नवकथेत प्रामुख्याने ग्रामीण समाजमन, दैनंदिन

जगण्याच्या संघर्षाचे चित्रण केले गेले असल्याने ग्रामजीवनाचे प्रतिबिंबच या साहित्यातून व्यक्त झाले. या साहित्यात आपला वेगळा असा ठसा उमटविणारे लेखक म्हणून कथाकार द.मा.मिरासदार यांची ओळख मराठी वाचकांना आहेच. मिरासदार, व्यंकटेश माडगूळकर आणि शंकर पाटील या तिघांचीही वाटचाल साधारण समांतरच चालू होती; मात्र प्रत्येकाची  वेगळी अशी एक खासियत होती. त्यांच्या लेखनातून ती वाचकांसमोर येत होती. व्यंकटेश माडगूळकर यांच्या लेखनात विनोद हा तसा फारसा चित्रित झालेला दिसून येत नाही. शंकर पाटील यांच्या लेखनात विनोद व गंभीरता यांचा सुरेख मिलाफ पाहायला मिळतो, तर मिरासदारांच्या लेखनातील विनोद हा ग्रामीण समाजमन, आपली दुःखे विसरण्यासाठीचा प्रयत्न व आपल्याच विसंगतीवरचं भाष्य करून त्यांतून एक वेगळाच आविष्कार ते वाचकांसमोर मांडत.

द. मा. मिरासदार यांच्या साहित्याचा आढावा घेतल्यास सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर या गावचे वर्णन आपल्याला वाचायला मिळते. तिथले समाजजीवन, चालिरीती, त्या भागांतील बोली भाषा, गावगाडा यांचे अस्सल चित्रण वाचकांसमोर उभे राहते. मिरासदारांनी सुरुवात जरी 'रानमाणूस' या ग्रामीण कथेने केलेली असली, तरी नंतर त्या कथालेखनाचा प्रवास हा ग्रामीण विनोदी कथेकडे होत गेलेला आहे, हे आपल्या सहज लक्षात येते. मराठीतील प्रसिद्ध विनोदी लेखक चिं. वि. जोशी यांना मिरासदार यांनी गुरू मानले होते. त्या विनोदाचा प्रभावही आपल्याला मिरासदारांच्या लेखनातून वाचायला मिळतो. जवळपास १०० विनोदी कथा त्यांनी लिहिल्या. त्या दरवर्षी दिवाळी अंकांत छापून येत-(साभार परत न येता). हाही एक विक्रमच द.मा. मिरासदारांच्या नावावर जमा आहे. हा विक्रम कुणी मोडला असेल, याची शक्यताही कमी आहे.

व्यंकटेश माडगूळकर, द.मा.मिरासदार, शंकर पाटील या लेखकत्रयींनी महाराष्ट्रभर कथाकथनाचे शेकडो जाहीर कार्यक्रम

केले. त्या काळात दळणवळणाची दुसरी सोय नसतानाही या तिघांनी मिळून कथाकथनाच्या माध्यमातून पूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला. मराठी कथा घरोघर पोहोचवली. रेडिओ, दूरचित्रवाणी या माध्यमांतूनही लोकांचे प्रबोधन व मनोरंजन या लेखकत्रयींनी केले. शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर व मिरासदार या प्रत्येकाची एक वेगळी शैली होती. त्यातून ती कथा खुलत असे व ऐकणारा त्या ग्रामजीवनाचा अनुभव घेत असे. त्या काळात शाळा-महाविद्यालयांतील स्नेहसंमेलने असली, की यांच्यापैकीच एक जण प्रमुख पाहुणा म्हणून असे, हे समीकरण अगदी ठरलेले. कथाकथनासारख्या माध्यमाचा केला गेलेला हा प्रभावी वापर इतर कोणी केला असेल, याबाबत थोडी शंकाच आहे.

मिरासदार यांच्या नावावर २५ पुस्तके असूनही, ही पुस्तके आजही वाचकप्रिय आहेत. वगनाट्य, एकांकिका, विनोदी नाटिका, ललित या प्रकारांतील लेखनही मिरासदारांनी केलं; मात्र कथाकार म्हणून त्यांची जी ओळख आहे, ती ग्रामीण विनोदी कथांमुळेच! 'मिरासदार आणि ग्रामीण विनोदी कथा' या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. हे विनोदाचं अस्सल नाणं आजही खणखणीत असंच आहे.

द.मा.मिरासदार यांची १४ एप्रिल रोजी ९७वी जयंती आहे. त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

अखिल मेहता

## नवी संहिता... नवा आशय...

TBC-33 Book No. 6

# द सीक्रेट फ्रेन्ड

**ख्रिस मुनी**

अनुवाद

**प्रकाश गोगटे**




भय, थरार आणि उत्कंठेचा अनोखा मिलाफ साधत वाचकांना गुंतवून ठेवणारी ख्रिस मुनींची रंगतदार कादंबरी


**किंमत : ५००/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# जंगली कुलगुरूची जंगी कथा

**डॉ. तेजस्वी कट्टीमनी**

अनुवाद

**अपर्णा नायगांवकर**




जगण्याची भ्रांत असलेला विद्यार्थी ते एका विश्वविद्यालयाला आकारस्वरूप देणारा कुलगुरू, एका थक्क करणाऱ्या प्रवासाची यशोगाथा...

**किंमत : २६०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

## आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये**

## डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये**

***Available on***

amazonkindle | Google Play Books

**Find us on: facebook®**

https://www.facebook.com/mehtapublishinghouse

# मेहता पब्लिशिंग हाऊस

## टी बुक क्लब

BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किमतीत मिळवा!

आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत
मिळवा पुस्तकं


* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा
सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx




नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी **eBooks**
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर –
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

ebook available on :

amazon kindle | Get it on Apple Books | Google Play Books



# वितरकाच्या नजरेतून

वाचनप्रेमी मित्रांनो,

नमस्कार. मी मुकेश जाधव, ‘Let’s Read Book Fair’ या नावाने मी पुस्तकविक्रीच्या व्यवसायात कार्यरत आहे.

मेहता पब्लिशिंगच्या अंकाच्या निमित्ताने वाचकांशी संवाद साधण्याची मला संधी मिळाली, याचा मला आनंद आहे.

या लेखाच्या निमित्ताने मी दोन चांगल्या उपक्रमांची माहिती देणार आहे. शाळांमध्ये ‘Let’s Read Book Fair’ च्या माध्यमातून आम्ही इंग्रजी पुस्तकांचे प्रदर्शन व विक्री करत आहोत. हे करत असताना आम्ही विद्यार्थ्यांशी संवाद साधतो.

विद्यार्थ्यांना आम्ही दोन विषय देऊन त्यांना बोलण्यासाठी प्रोत्साहन देतो. ते दोन विषय पुढीलप्रमाणे-

1) Let’s speak about your favourite book.

2) Let’s speak about your favourite Author.

या दोन विषयांवर विद्यार्थी On the spot बोलतात. उत्स्फूर्तपणे मांडलेल्या या विषयांमुळे ऐकणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होण्याचे प्रमाण वाढते.

आवडत्या लेखकांमध्ये- J. K. Rowling, Jeff Kinny, Rick Riordan, Dan Brown, Roal Dahl, Dav Pilkey, Enid Blyton, या परदेशी लेखकांबरोबरच आपल्या देशातील, Sudha Murty, Ruskin Bond, Deepak Dalal, Amish Tripathi, यांबद्दल मुले भरभरून बोलतात. एखादा लेखक त्यांना का आवडतो,




त्या लेखकाच्या लेखनशैलीची खासियत, त्या लेखकाने लिहिलेली पुस्तके यांविषयी ते बोलतात.

बऱ्याच मुलांना नवीन प्रकाशित पुस्तकांबद्दल बोलायला आवडते.

जगात अनेक ठिकाणी वाचकांचे गट 'Book Talk' च्या माध्यमातून विविध पुस्तकांविषयी आणि लेखकांबद्दल बोलत असतात, तोच 'Pattern' आम्ही विविध शाळांमध्ये काम करत असताना वापरतो.

आणखी एक उपक्रम म्हणजे- 'Make your own Bookmark.' यामध्ये मुले स्वत: 'Bookmark' बनवतात. त्यात विविध लेखकांचे 'quotes' दिले जातात. काही विद्यार्थी लेखकांचे ' sketches' काढतात, आणि इतरही काही कलाकुसर सादर करतात. आम्ही विजेत्यांना पुस्तक भेट देऊन प्रोत्साहन देण्याचे काम करतो.

'Let's Read' च्या माध्यमातून आम्ही मुलांपर्यंत पुस्तके पोहोचविण्याचे काम करतो, याचा आम्हाला आनंद आहे. गेल्या दोन वर्षांमध्ये आम्ही जवळजवळ ६० प्रदर्शने केली. या सर्व प्रदर्शनांना वाचकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. येणाऱ्या काळात आम्ही अनेक नवनवीन उपक्रम राबविणार आहोत.


उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये 'Let's Read' च्या माध्यमातून 'Children's Book Fest' आयोजित करायचा विचार आहे. यात अनेक गोष्टींचा समावेश असेल. मराठी आणि इंग्रजी प्रकाशकांच्या सहकार्याने अनेक बालसाहित्यिकांचे कार्यक्रम यात आयोजित केले जातील.

किमान १५ दिवस हा 'Book Fest' असेल. त्याविषयी सविस्तर माहिती आम्ही लवकरच आपल्यासमोर घेऊन येऊ. तोपर्यंत वाचत राहू आणि पुस्तकांबद्दल बोलत राहू.

**– मुकेश जाधव,**
'Let's Read Book Fair'

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# द रॅकेटिअर

**जॉन ग्रिशॅम**

अनुवाद

**अशोक पाथरकर**

*सरळमार्गी माल्कमच्या आयुष्यात आलेलं थरारनाट्य, त्यावर बुद्धिकौशल्य व चातुर्याने केलेली मात याचा रोमांचक प्रवास.*

**मी** वकील आहे आणि मी तुरुंगात आहे. ती एक दीर्घ कहाणी आहे.

माझे वय त्रेचाळीस आहे आणि वॉशिंग्टन डी.सी.च्या एका भित्र्या आणि ढोंगी फेडरल (केंद्रीय) न्यायाधीशाने ठोठावलेली दहा वर्षांची शिक्षा माझी अर्धी भोगून झाली आहे. माझ्या सर्व अपिलांची सुनावणी होऊन गेली आहे आणि कोणत्याही प्रकारचे अर्ज, कायद्यातील एखादे

अज्ञात कलम,एखादी तांत्रिक पळवाट, देवाची प्रार्थना, असे माझ्या भात्यांतील मला माहीत असलेले सर्व बाण वापरून झाले आहेत. आता काहीही उरलेले नाही. माझ्या कायद्याच्या ज्ञानाचा फायदा घेऊन काही कैदी करतात त्याप्रमाणे वेगवेगळ्या प्रकारचे निरुपयोगी अर्ज आणि रिट्स (प्राधीलेख) वगैरे करत राहून मला कोर्टाचे कामकाज तुंबवता आले असते; पण त्याचा काहीही उपयोग झाला नसता. माझा हेतू साध्य होईल, असे आता काहीही उरलेले नाही. चांगल्या वर्तणुकीसाठी–आणि माझी वर्तणूक अगदी आदर्श राहिली आहे – शिक्षेच्या काळात शेवटी काही आठवड्यांची सूट मिळेल तेवढी सोडली, तर अजून पाच वर्षे काढल्याशिवाय सुटका होण्याची कोणतीही आशा नाही, ही वस्तुस्थिती आहे.

खरं म्हणजे मी आता स्वत:ला वकील म्हणता कामा नये, कारण तांत्रिकदृष्ट्या मी आता वकील नाहीये. माझ्यावर आरोप सिद्ध झाल्याबरोबर ‘व्हर्जिनिया स्टेट बार’ ने माझी वकिलीची सनद हिसकावून घेतली. त्यांनी अगदी स्पष्ट शब्दांत म्हटले आहे– फसवणुकीचा आरोप सिद्ध झाला, म्हणजे वकिलीची सनद रद्द. माझी सनद रद्द करण्यात आली आणि माझ्यावरील कारवाईला ‘व्हर्जिनिया लॉयर्स रजिस्टर’मध्ये प्रसिद्धी देण्यात आली. त्या महिन्यात तीन वकिलांची ‘बार’मधून हकालपट्टी झाली, ते नेहमीच्या सरासरीला धरूनच होते.

पण माझ्या छोट्याशा जगात मी ‘तुरुंगाचा वकील’ म्हणून ओळखला जातो आणि त्यामुळे मी रोज अनेक तास तुरुंगातील माझ्याबरोबरच्या कैद्यांच्या कायद्याच्या समस्या सोडवण्यात घालवतो. मी त्यांच्या अपिलांचा अभ्यास करतो आणि अर्ज दाखल करतो. मी साधी मृत्युपत्रं आणि कधीकधी जमिनीची कागदपत्रं बनवतो. काही सुशिक्षित लोकांची करारपत्रं तपासतो. कायद्याला धरून असलेल्या तक्रारींसाठी मी सरकारवर दावे दाखल केले आहेत; पण मला फालतू वाटणाऱ्या गोष्टींसाठी कधीच नाही आणि घटस्फोटाची प्रकरणे तर बरीच असतात.

माझा कारावास सुरू झाल्यावर आठ महिने आणि सहा दिवसांनी मला एक जाडजूड पाकीट आले. पत्रांसाठी कैदी आसुसलेले असतात; पण ते पाकीट आले नसते तर बरे झाले असते. ते माझ्या पत्नीच्या वतीने आले होते. तिला घटस्फोट हवा होता. माझ्या खटल्याच्या दरम्यान मला खंबीर

साथ देणाऱ्या 'डायोन'ला मला शिक्षा झाल्यावर वर्षाच्या आतच घटस्फोट हवा होता. माझा विश्वासच बसेना. ती नोटीस वाचून मला धक्का बसला. माझे पाय लटपटू लागले. डोळ्यांत पाणी येणार, असे वाटताच थोडा एकांत मिळावा म्हणून मी माझ्या खोलीकडे धाव घेतली. तुरुंगात अनेकांच्या डोळ्यांत अश्रू येतात; पण ते नेहमी लपवले जातात.

मी घर सोडले, तेव्हा बो सहा वर्षांचा होता. तो आमचा एकुलता एक मुलगा होता. आम्ही अजून मुले होऊ देणार होतो. आता पुढचे गणित सोपे आहे आणि मी ते अनेकदा केले आहे. मी सुटेन तेव्हा तो सोळा वर्षांचा तरुण मुलगा असेल. वडील आणि मुलाने एकत्र घालवावीत, अशा अमूल्य दहा वर्षांना मी मुकणार होतो. साधारण बारा वर्षांचे होईपर्यंत मुलांना वडील देवासारखे वाटतात. ते कोणतीही अनुचित गोष्ट करणार नाहीत, अशी त्यांची धारणा असते. मी बो ला टी-बॉल आणि सॉकर शिकवला. कुत्र्याच्या पिल्लाप्रमाणे तो माझ्या मागेमागे असायचा. आम्ही मासे पकडायला जायचो, कँपला जायचो आणि कधीकधी शनिवारी सकाळी न्याहारी झाल्यावर तो माझ्याबरोबर माझ्या ऑफिसातही यायचा. तो म्हणजे माझे सर्वस्व होते आणि 'मी आता खूप दिवस तुला दिसणार नाही,' हे त्याला समजावून सांगताना आमच्या दोघांचंही काळीज विदीर्ण झालं होतं. तुरुंगात गेल्यावर मी त्याला मला भेटायला यायची बंदी केली. त्याला मिठीत घ्यायला मी कितीही आसुसलेला असलो, तरी मी तुरुंगात आहे, हे त्याला बघायला लागू नये, अशी माझी इच्छा होती.

तुम्ही तुरुंगात असाल आणि तिथून लवकर बाहेर पडण्याची शक्यता नसेल, तर घटस्फोटाच्या दाव्याचा सामना करणे जवळजवळ अशक्यच असते. आधीच आमची संपत्ती फार नव्हती आणि जी होती ती सरकारने अठरा महिने दिलेल्या त्रासामुळे आणखी कमी झाली होती. आमचे मूल आणि एकमेकांबद्दलचा विश्वास एवढे सोडून बाकी सर्व काही गेले होते. मूल हा मुख्य आधार होता. परस्परांबद्दलचा विश्वास मात्र लयाला गेला. चिकाटीने आणि धीराने दिवस काढण्याच्या शपथा डायोनने घेतल्या होत्या; पण मी गेल्यावर तिला वास्तव जाणवू लागले. आमच्या लहानशा गावात तिला एकटे आणि तुटल्यासारखे वाटू लागले. 'लोक माझ्याकडे बघतात आणि कुजबुजतात,' असे तिच्या पहिल्या पत्रामध्ये तिने लिहिले. 'मला फार

एकटं वाटतं' – दुसऱ्या एका पत्रात तिने तक्रार केली. लवकरच पत्रे त्रोटक होऊ लागली, त्यांची संख्याही कमी झाली व तिचे भेटायला येणेही कमी झाले.

'डायोन' फिलाडेल्फियात वाढली आणि खेड्यातल्या जीवनाची गोडी तिला कधीच लागली नाही. एका काकाने नोकरी देऊ करताच तिला तिकडे जायची घाई झाली. तिने दोन वर्षांपूर्वी पुनर्विवाह केला आणि आता अकरा वर्षांचा असलेला बो दुसऱ्या बापाच्या पंखांखाली गेला. बो ला मी लिहिलेल्या शेवटच्या वीस पत्रांचे उत्तर आले नाही. ती त्याच्यापर्यंत पोहोचलीच नसतील, असे मला निश्चित वाटते.

बऱ्याचदा त्याची-माझी पुन्हा भेट होईल की नाही, याबद्दल मला शंका वाटते. मला वाटतं, मी भेटायचा प्रयत्न करीन; पण खात्री नाही. ज्याच्यावर आपला एवढा जीव आहे, त्या मुलाने आपल्याला ओळखलेच नाही तर, अशी भीती वाटते. नेहमीच्या बाप आणि मुलाप्रमाणे आम्ही आता कधीच राहणार नाही. खूप काळ भेट न झालेल्या वडिलांनी प्रकट होऊन त्याच्या आयुष्याचा पुन्हा भाग होऊन राहण्याचा आग्रह धरणे, हे बोसाठी योग्य होईल?

यावर विचार करण्यासाठी माझ्याकडे भरपूर वेळ आहे. मी मेरिलँडमधील फ्रॉस्टबर्गजवळच्या 'फेडरल प्रिझन कँप' मधील कैदी क्रमांक-४४८६१-१२७ आहे. कैद्यांपैकी जे अहिंसक वाटतात आणि ज्यांना दहा वर्षे किंवा त्याहून कमी शिक्षा झाली आहे, अशा कैद्यांसाठी 'कँप' ही सौम्य सुरक्षा असलेली व्यवस्था आहे. काही कारणांमुळे–जी मला कधीच सांगण्यात आली नाहीत–मला पहिले बावीस महिने केंटकीमधील 'लुई व्हील'जवळच्या मध्यम सुरक्षा असलेल्या ठिकाणी ठेवले होते. सरकारच्या भाषेत त्याला FCI – 'फेडरल करेक्शनल इन्स्टिट्यूशन' ऊर्फ 'केंद्रीय सुधार संस्था' म्हणतात आणि आता मी असलेल्या 'फ्रॉस्टबर्ग कँप'च्या तुलनेत तो फार वेगळाच प्रकार होता. FCI हा दहा वर्षांपेक्षा जास्त शिक्षा झालेल्या हिंसक कैद्यांसाठी असतो. माझ्यावर तिथे जरी कधी शारीरिक हल्ला झाला नाही, तरी तिथले जीवन बरेच खडतर होते. पूर्वायुष्यात 'मरीन' असल्याचा मला फायदा झाला.

तुरुंगाच्या प्रकारांमध्ये 'कँप' म्हणजे एक वसाहत असते. तिला भिंती,

कुंपण, धारदार तारेची वेटोळी, पहारेकऱ्यांचे उंच मनोरे हे काहीही नसते; फक्त काही थोडे बंदूकधारी पहारेकरी असतात. 'फ्रॉस्टबर्गचा कँप' त्या मानाने नवा आहे आणि इथल्या सोयी बहुतेक सार्वजनिक शाळांमधील सोयींपेक्षा जास्त चांगल्या आहेत आणि का नसाव्यात? अमेरिकेत प्रत्येक कैद्यावर वर्षाला ४०हजार डॉलर खर्च होतो, तर प्राथमिक शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षण देण्यासाठी ८हजार डॉलर खर्च येतो. इथे आमच्याकडे समुपदेशक, व्यवस्थापक, सामाजिक कार्यकर्ते, परिचारिका, सेक्रेटरी, अनेक प्रकारचे साहायक आणि प्रशासक आहेत, ज्यांना आपण आठ तास कोणती कामे करतो, हे सांगणे कठीण जाईल. अखेरीस ते म्हणजे फेडरल सरकारच आहेत. प्रवेशद्वाराजवळचा कर्मचाऱ्यांचा पार्किंग लॉट नेहमी सुंदर गाड्या आणि ट्रक्सनी खचाखच भरलेला असतो.

इथे फ्रॉस्टबर्गला ६०० कैदी आहेत आणि काही अपवाद वगळले, तर आम्हा सगळ्यांची वागणूक चांगली आहे. ज्यांचा भूतकाळ हिंसक आहे, ते आता धडा शिकले आहेत आणि त्यांनाही सभोवारचे सभ्य वातावरण आवडू लागले आहे. ज्यांचे आयुष्य तुरुंगातच गेले, त्यांना अखेरीस एक उत्तम घर मिळाले आहे. या निर्ढावलेल्या लोकांपैकी अनेकांना आता इथून जायची इच्छा नाही. त्यांना आता इथल्या सुसंघटित जीवनाची इतकी सवय झाली आहे, की बाहेरचे जीवन जगणे त्यांना आता कठीण जाईल. चांगला उबदार बिछाना, दिवसातून तीन जेवणे, वैद्यकीय सेवा याहून चांगले बाहेरच्या जगात कसे मिळेल?

ही जागा रमणीय आहे, असं मला म्हणायचं नाही; ती तशी नाहीच आहे. एके दिवशी आपल्याला इतका जोराचा धबका बसेल, असे स्वप्नातही वाटले नसेल, असे माझ्यासारखे अनेक जण इथे आहेत. स्वत:चा व्यवसाय असणारे, नोकरी-धंदा असणारे, पैसा-अडका असणारे, स्वत:चे चांगले कुटुंब आणि 'कंट्री क्लब'ची मेंबरशिप असणारे. माझ्या 'गोऱ्या टोळी'त कार्ल आहे – तो नेत्रतज्ज्ञ आहे. त्याने त्याच्या मेडिकेअर बिलिंगमध्ये घोटाळा केला; कर्मिट आहे – त्याने एकच जमीन वेगवेगळ्या दोन-तीन बँकांमध्ये गहाण ठेवली आणि वेस्ले आहे – तो पेनसिल्वेनिया राज्यात सिनेटर (आमदार) होता; पण त्याने लाच घेतली आणि मार्क – तो एका गावात सावकारी करायचा आणि त्याने काहीतरी घोटाळा केला.

कार्ल, कर्मिट, वेस्ले आणि मार्क. सगळे गोरे, सरासरी वय एक्कावन. सर्व जण आपला गुन्हा कबूल करतात आणि मग मी–माल्कम बॅनिस्टर, कृष्णवर्णीय, वय त्रेचाळीस, आपण कोणता गुन्हा केला, हे माहीतही नसताना त्याबद्दल शिक्षा झालेला.

या क्षणी फ्रॉस्टबर्गला, पांढरपेशा गुन्ह्यासाठी शिक्षा झालेला मी एकमेव काळा माणूस आहे, हाही एक विक्रमच नाही का?

माझ्या 'काळ्या टोळी'तील लोकांचे वर्गीकरण इतके स्पष्ट नाही. तिच्यातील बहुतेक जण डीसी आणि बाल्टिमोरच्या रस्त्यांवरील मुले आहेत. त्यांना ड्रग्जसंबंधीच्या गुन्ह्यांखाली पकडण्यात आले. पॅरोल मिळाला, की ते पुन्हा रस्त्यांवर परततील आणि त्यांच्यावर पुन्हा गुन्हा सिद्ध न होण्याची शक्यता वीस टक्के असेल. शिक्षण नाही, कोणतीही कौशल्ये नाहीत आणि गुन्हेगारी पार्श्वभूमी–ते कसे यशस्वी होणार?

खरे म्हणजे 'फेडरल कँप'मध्ये टोळ्या अशा नसतात आणि हिंसाही नसते. तुम्ही कोणाशी मारामारी केली, कोणाला धमकावले, तर तुम्हाला इथून उचलून दुसऱ्या, याच्यापेक्षा खूप वाईट अशा ठिकाणी तुमची रवानगी करतात. कुरबुरी बऱ्याच असतात, मुख्यत: टीव्हीवरून, पण अजून कोणी मारामारी केलेली मी बघितलेली नाही. या लोकांपैकी काही जण राज्यांच्या तुरुंगात राहिलेले आहेत. ते तिथल्या ज्या गोष्टी सांगतात, त्या अंगावर काटा आणणाऱ्या आहेत. इथून दुसरीकडे जायला कोणीही तयार नसतो. त्यामुळे आम्ही चांगले वागत दिवस मोजतो. पांढरपेशा कैद्यांसाठी, शिक्षा होणे ही एक लाजिरवाणी गोष्ट असते. त्यांची प्रतिष्ठा धुळीला मिळते, समाजातील दर्जा घसरतो आणि त्यांची जीवनशैली बदलते. कृष्णवर्णीयांच्या बाबतीत, ते जिथून आलेले असतात आणि जिथे जाणार असतात, त्या मानाने कँपमधले जीवन जास्त सुरक्षित असते. त्यांना झालेली शिक्षा म्हणजे त्यांच्या गुन्हेगारी रेकॉर्डमधील केवळ आणखी एक नोंद असते. कायमचे गुन्हेगार होण्याच्या वाटचालीतील आणखी एक पाऊल असते.

त्यामुळे मला मी काळ्याऐवजी गोरा असल्यासारखे वाटते. इथे फ्रॉस्टबर्गला आणखी दोन वकील आहेत. रॉन नेपोली कोकेनमुळे वाट लागण्यापूर्वी फिलाडेल्फियाला प्रसिद्ध फौजदारी वकील होता. तो ड्रग्जसंबंधीच्या कायद्यांचा तज्ज्ञ होता. न्यू जर्सीपासून कॅरोलायनापर्यंतच्या मध्य-अॅटलांटिक प्रदेशातील

ड्रग व्यवसायातील मोठ्या व्यापाऱ्यांचा आणि तस्करी करणाऱ्यांचा वकील होता. तो त्याचे मानधन काही रोख आणि काही कोकेनच्या रूपात घेणे पसंत करायचा आणि अखेरीस सर्व काही गमावून बसला. इन्कम टॅक्सवाल्यांनी त्याला कर चुकवण्याबद्दल पकडले. आता त्याची नऊ वर्षांची शिक्षा अर्धी भोगून झाली आहे. हल्ली रॉन ठीक नसतो. तो नेहमी निराश दिसतो, कितीही सांगितले तरी व्यायाम करत नाही आणि स्वत:ची काळजी घेत नाही. त्याचे वजन वाढत आहे, हालचाली मंदावल्या आहेत, तो चिडखोर बनला आहे आणि त्याची तब्येतही ठीक राहत नाही. पूर्वी तो त्याच्या अशिलांच्या आणि ड्रग्जच्या तस्करीमधील त्यांच्या धाडसाच्या अतिशय थरारक कथा सांगायचा; पण आता तो कँपच्या आवारात कुठेतरी बसून राहतो. एकामागून एक 'फ्रिटो'च्या पिशव्या फस्त करतो आणि शून्यात नजर लावून बसलेला असतो. त्याला कोणीतरी पैसे पाठवतंय आणि तो ते बहुतेक 'जंक फूड'वर खर्च करतो.

तिसरा माजी वकील आहे वॉशिंग्टनचा ॲमॉस काप–एक आतली माहिती काढणारा, पाताळयंत्री गडी; ज्याचा प्रत्येक राजकीय लफड्याशी काहीतरी संबंध असायचा. कापवर आणि माझ्यावर एकदमच खटला चालला. एकाच न्यायाधीशाने आम्हाला दोषी ठरवले आणि प्रत्येकी दहा वर्षांची शिक्षा ठोठावली. एकंदर आठ आरोपी होते–सात वॉशिंग्टनचे आणि आठवा मी. कापवर नेहमीच कोणत्या तरी गुन्ह्याबद्दल आरोप असायचे आणि आमच्या ज्यूरीच्या मते, तो निश्चितच दोषी होता. माझा कटाशी कधीच काहीही संबंध नव्हता, हे कापला प्रथमपासून माहीत होते आणि आताही माहीत आहे; पण भ्याड आणि पाताळयंत्री असल्यामुळे त्याने ते कधीच कबूल केले नाही. फ्रॉस्टबर्गला हिंसाचाराला कडक बंदी आहे; पण मला ॲमॉस कापबरोबर फक्त पाच मिनिटे द्या आणि मी त्याची मुंडी मुरगाळतो की नाही ते बघा. तो हे जाणून आहे आणि त्याने हे वॉर्डनलासुद्धा पूर्वीच सांगितले असावे, असा मला संशय आहे. ते त्याला माझ्या अड्ड्यापासून शक्य तितके दूर पश्चिमेकडील भागात ठेवतात.

आम्हा तिघा वकिलांपैकी फक्त मीच एकटा इतर कैद्यांना त्यांच्या कायद्याशी संबंधित अडचणींमध्ये मदत करायला तयार असतो. मला ते करण्यात आनंद वाटतो. त्यात आव्हान असते आणि त्यामुळे माझा वेळही

जातो. एक वकील म्हणून मला काही भविष्य आहे की नाही याबद्दल मला शंका असली, तरी त्यामुळे माझ्या कायद्यातील कौशल्याला झळाळी मिळत राहते. माझी सुटका झाल्यावर मला बारचे सदस्यत्व पुन्हा द्यावे असा मी अर्ज करू शकेन; पण ती प्रक्रिया बरीच किचकट असेल. वस्तुस्थिती ही आहे की, वकिलीत मी कधीच फार पैसा मिळवला नाही. मी एका लहान गावातील वकील होतो आणि तोही काळा आणि काही थोड्या अशिलांकडेच बऱ्यापैकी फी देण्याची कुवत होती. तेच अशील पटकावण्यासाठी ब्रॅडॉक स्ट्रीटवर डझनावारी इतर वकील होते. स्पर्धा फार तीव्र होती. हे सगळं संपलं की काय करायचे, ते माझे नक्की नाही; पण पुन्हा वकिली सुरू करेन की नाही, याबद्दल मला तीव्र शंका आहे.

मी त्या वेळेस अठ्ठेचाळीस वर्षांचा, घटस्फोटित असेन आणि अजून तब्येतही चांगली असेल, अशी मला आशा आहे.


पाच वर्षे म्हणजे अनंतकाळ आहे. मी रोज एकटाच कँपच्या हद्दीला (तिला 'लाइन' म्हणतात) लागून जॉगिंगसाठी असलेल्या मातीच्या रस्त्यावर लांबवर फिरायला जातो. ती 'लाइन' ओलांडली, तर तुम्ही पळून गेलात, असे समजले जाते. ही तुरुंगाची जागा असली, तरी हा रमणीय दृश्यांनी भरलेला अतिशय सुंदर असा प्रदेश आहे. दूरवरच्या टेकड्यांकडे बघताना मी 'लाइन' ओलांडायचा मोह मोठ्या मुश्कीलीने टाळतो आणि वाटेवर चालत राहतो. तिथे मला आड येईल, असे कुंपण नसते. माझ्या नावाने ओरडणारा पहारेकरी नसतो. मी पलीकडल्या दाट जंगलात पसार होऊन कायमचा नाहीसा होऊ शकतो. तिथे भिंत असती तर बरं झालं असतं, असं मला वाटत-दहा फूट उंच, भक्कम विटांची, वर धारदार तारेची वेटोळी असलेली-ज्यामुळे मला पलीकडच्या टेकड्या दिसल्या नसत्या, स्वातंत्र्याची स्वप्ने पडली नसती, हा तुरुंग आहे हे समजलं असतं! आम्ही इथून जाऊ शकत नाही. इथे भिंत बांधा म्हणजे आम्हाला मोह होणार नाही.

तो मोह नेहमीच असतो आणि तो काबूत ठेवण्याचा मी कितीही प्रयत्न केला, तरी मी शपथ घेऊन सांगतो, तो दिवसेंदिवस प्रबळ होत चालला आहे.

◆



## पुस्तकाच्या पानांतून




# अस्तित्वाचा उत्सव

**गुणवंत शाह**

अनुवाद

**मृणालिनी देसाई**

*'ईशावास्य' उपनिषदाचं रसाळ निरूपण मांडणारं आणि जीवनाची लय स्पष्ट करणारं अद्‌भुत मार्गदर्शक पुस्तक*

### पूर्णतेचे परमकाव्य

**भूमिका-**

आकाशाची लय नि:शब्दातून प्रकट होते. पुष्पाची लय त्याच्या सुगंधातून दरवळते. झुळझुळ वाहणाऱ्या झऱ्याची लय त्याच्या तालबद्ध वाहण्यातून उमटते. पृथ्वीची लय ऋतचक्रातून, वृक्षाची लय वसंतातून आणि वसंताची लय कोकिळेच्या कुहूकारातून प्रगट होत असते. विवेकातून विद्येची लय जाणवते तर आपल्या अस्तित्वाची लय

मनाच्या समतेतून जाणवते. तसे पाहता, कृष्णाची रासलीला हे या सृष्टीमध्ये अव्याहत चालणाऱ्या लयलीलेचे मधुर प्रतीक आहे.

रोज सकाळी एक लयबद्ध सुरुवात होते. एकामागून एक तारे अदृश्य होतात. झाडे ध्यानस्थ होऊन सूर्योदयाची प्रतीक्षा करतात. तर पक्षी आपल्या चिमुकल्या चोचीतून आसपासच्या वातावरणात ध्वनी पसरवतात. एका चोचीतून प्रकट होणाऱ्या ध्वनीचा दुसऱ्या चोचीतून प्रकट होणाऱ्या ध्वनीशी संबंध असतोच, असेही नाही आणि तरीही ते सर्व वेगवेगळे ध्वनी मिळून साऱ्या अस्तित्वालाच एका आगळ्या प्रसन्नतेने भरून टाकतात. अशी एक वेगळीच काव्यमय अराजकता, विविधता आणि अखिलता यांच्यामधला जो सुमेळ आहे, त्यालाच आपण 'कलरव' म्हणतो. ही सारी सृष्टी म्हणजेच अव्याहत चाललेली. जीवनातून क्षणोक्षणी प्रगट होणारी एक तालबद्धता आहे. अस्तित्वाचा तो एक आनंदोत्सव आहे.

आपल्या वैदिक ऋषींनी पर्वताच्या पायथ्याशी नद्यांच्या संगमाजवळ शांत व सुरम्य तपोवनात या अस्तित्वाच्या रहस्याचा शोध घेतला. शतकानुशतके माणसाच्या जीवनात एक ऊर्ध्वमूल अस्वस्थता सळसळते आहे. तो स्वत: अन्त्य आहे आणि म्हणूनच असीम, अनंत, सर्वव्यापी आणि सूक्ष्म असं जे आहे, त्याची ओढ त्याला चैन पडू देत नाही. त्याचा शोध काही सगळेच करतात असं नाही. परंतु ती ओढ कधी ना कधी प्रत्येकाला जाणवते खरीच. ही ओढ म्हणजेच तादात्म्य पावण्याची अत्यंत तीव्र इच्छा असते. एका बाजूला 'मी' हा प्रत्यक्ष हाता-पायांचा जिवंत माणूस. जो नश्वर आहे आणि समोर अप्रत्यक्ष का असेना पण काहीतरी आहे. ऋषींनी सांगितलं आहे की आपल्या समोर शाश्वत सत्य आहे. नश्वर मी आणि हे शाश्वत यांना जोडणारा सेतू 'योग' म्हणून ओळखला गेला. योगामुळे जी दृष्टी प्राप्त होते तीच 'योगज दृष्टी.' ध्यानस्थ अवस्थेत जे अंत:स्फुरण निर्माण होते त्यामुळे अतींद्रिय (इंद्रियांद्वारे होणाऱ्या ज्ञानाहून विशेष) असं ज्ञान होऊ लागते. व्यक्तिगत जीवनातली लय अखिल सृष्टीच्या लयीशी एकरूप होऊ लागते. त्या वेळी लयलीनतेच्या आनंदाची अनुभूती होते. ही योगज दृष्टी म्हणजे ऋषींनी साधनेद्वारा मिळवलेला लयलीनतेचा प्रसाद आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये विचारांची एक धारा शतकानुशतके वाहते

आहे. आपले अणूवैज्ञानिक, कैलासवासी होमी भाभा यांच्या जीवनावर आधारित एक डॉक्युमेंटरी काही वर्षांपूर्वी पाहिली. तिची सुरुवात एका विचित्र प्रेरक प्रश्नाने होते, 'भारतासारखा प्राचीन देश डॉ. भाभांसारखा अणुवैज्ञानिक निर्माण करू शकला, यामागचे रहस्य काय असावे?' आणि या प्रश्नाचे उत्तर अत्यंत ठाम आवाजात लगेच दिले आहे, 'या भूमीमध्ये माणूस नेहमी विचार आणि विचार करीतच राहिला आहे.'

आपले ऋषी सत्यशोधक होते. विज्ञाननिष्ठांना अंधश्रद्ध होणे फार कठीण जाते. परंतु परमसत्यशोधक ऋषींना ते अशक्यच होते. वेदकालीन ऋषींनी तर्काला साक्षात ऋषीच म्हटले आहे. 'तर्को वे ऋषी' : मनुने तर म्हटले आहे की, 'जी व्यक्ती तर्काची मदत घेऊन शोध घेते, तिलाच धर्म म्हणजे काय ते कळू शकेल, इतरांना नाही. (यस्तर्केणानुसंधत्ते स धर्मं वेद नेतर:)' झाडावर फुललेले फूल हे हारामध्ये गुंफलेल्या फुलांच्या सत्यापेक्षा अधिक स्पष्ट व सत्य आहे. तर्काचा पन्हा परमसत्याचे माप काढण्यासाठी अपुरा पडतो.* तरी आपण तर्काची उपेक्षा न करता तर्काची मर्यादा स्वीकारली पाहिजे, या मताला आपल्या संस्कृतमध्ये आदरपूर्वक मान्यता दिली आहे. शहाणपणाशिवाय तर्क हा मूठ नसलेल्या चाकूसारखा आहे. तो भाजी चिरण्याऐवजी धरणाऱ्याची बोटेच रक्तबंबाळ करील.

चतुर्वेद हे वैदिक ऋषींच्या योगज दृष्टीचे फळ आहे. आपल्याला मिळालेला हा फार मोठा वारसा आहे. त्यातला 'ऋग्वेद' हा जगातला प्राचीनतम ग्रंथ. वेदांना 'अपौरुषेय' म्हणतात. म्हणजेच त्यांची रचना ईश्वराने केली आहे, माणसाने नाही, अशी भावना.

परमशांतीच्या अनुभवाच्या क्षणी वैदिक ऋषींना जे ज्ञान झाले, जे शहाणपण मिळाले, त्या गंगोत्रीचा संबंध परम अस्तित्व अशा परमेश्वराशी होता. वेदमंत्र लिहिले देखील गेले नाहीत. छापण्याचा तर प्रश्नच नव्हता; ते उद्‌गार होते. हे आदी उद्‌गार हजारो वर्षं जसेच्या तसे सांभाळून आपल्यापर्यंत पोहोचवले गेले.त्यासाठी ब्राह्मणांनी जी श्रवणसाधना आणि स्मरणसाधना केली, त्याचा फार मोठा वाटा आहे. पिढ्यान्‌पिढ्या अखंड स्वाध्याय आणि प्रवचन यांच्या जोरावर वेदमंत्रांना त्यांच्या शुद्ध रूपात कायम राखणाऱ्या अकिंचन ब्राह्मणांचे आपण सर्व अत्यंत ऋणी आहोत.

वेदांपासून सुरू झालेली ही विचारयात्रा अविरतपणे चालूच राहिलेली आहे. ही 'विचारयात्रा' म्हणजेच 'विकासयात्रा' आणि 'विज्ञानयात्रा'. वेदांवर

सायणाचार्यांपासून मॅक्समुल्लरपर्यंत साऱ्यांनी भाष्ये लिहिली. स्वामी विवेकानंद इंग्लंडला गेले तेव्हा प्रो. मॅक्समुल्लरच्या घरी मुद्दाम त्यांना भेटण्यासाठी गेले. प्रोफेसर पहिल्या मजल्यावरून स्वामींना घेण्यासाठी खाली आले. त्या दोघांनी एकमेकांना भेटून पुष्कळ मनमोकळेपणाने गप्पागोष्टी केल्या. निरोप देताना मॅक्समुल्लर स्वामींना पोचवण्याकरिता रस्त्यापर्यंत आले. तेव्हा युवक विवेकानंदांनी आदरपूर्वक वंदन करून म्हटले, ''सर, तुम्ही इतके कष्ट घेऊन इथपर्यंत यावं याने मला लाजल्यासारखं होतं.'' तेव्हा प्रो. मॅक्समुल्लर त्यांना म्हणाले, ''हे पाहा स्वामी, रामकृष्ण परमहंसाच्या शिष्याला भेटण्याचं सौभाग्य माणसाला क्वचितच लाभतं.'' स्वामी विवेकानंदांनी मॅक्समुल्लर यांचा उल्लेख करताना वेदांचे थोर भाष्यकार महान सायणाचार्य महर्षीच मॅक्समुल्लर रूपाने भेटले असं म्हटले आहे.

**विश्वामित्र ते विनोबा-**

आपल्या अस्तित्वाची लय शोधून ती मिळवणे, हा आपला जन्मसिद्ध अधिकार आहे. हे अस्तित्व केवळ अनन्य आहे. आपल्या जीवनाचे मूल्य आपल्याइतकं कोणाला कळणार आहे? कधीकधी वाटते की अगदी अप्रत्यक्ष, अचिन्त्य, अप्रमेय आणि जवळजवळ अप्राप्यच अशा त्या परमेश्वराशिवाय खरंच आपलं काही अडतं का? ज्यांना काहीतरी गवसलं आहे, असे गुरू सहसा भेटत नाहीत आणि ज्यांना काहीही सापडलेले नाही, ते आपल्याला फसवण्यासाठी टपून बसलेले आहेत. सामान्य माणसांनी काय करायचे? कोठे जायचे? कबीराने या समस्येचे उत्तर देऊन टाकले आहे :

''लहरी ढूंढे लहरको, कपडा ढूंढे सूत ।
जीव ढूंढे ब्रह्म को, तिनो ऊत के ऊत ।''

ही गोष्ट लगेच पटते. पाणी आणि लहर एकच आहे. कपड्यांनी सुताचा शोध घ्यावा यात काय अर्थ आहे? जीव ब्रह्माचा शोध घेऊ पाहातो ; परंतु शिव आणि जीव यांच्यामध्ये भेदच कुठं आहे? म्हणून संत कबीर म्हणतात की, हे तिघेही जिथल्या तिथेच आहेत. कारण भिन्नताच नाही तर शोध कसला? पण आपणच ब्रह्म आहोत, अशी आत्मप्रतीती होणं शक्य आहे का? ध्यान धरून बसले तरी मन कुठल्या कुठं भटकते. परमतत्त्वाचे सोडा; पण लयलीनतेच्याही जवळपास जाता येत नाही. डोळे

मिटूनही ध्यान कसे ते राहतच नाही, मग काय करायचे?

ध्यान धरण्यासाठी अंधार भारी उपयोगी पडतो. डोळे बंद असोत की उघडे काहीच फरक नाही, असं वाटलं म्हणजे समजावे की आता ध्यानासाठी आदर्श असा अंधार सापडला आहे. कान ऐकत असोत वा बधिर असोत काहीच फरक पडत नाही, असं झालं की समजावे ध्यानासाठी आदर्श शांतता गवसली आहे. तुम्हाला कोणी दिसत नाही आणि कोणी तुमच्याकडे पाहत नाही, अशी स्थिती म्हणजे ध्यानासाठी आदर्श असा एकांत मिळाला आहे. अशी आदर्श स्थिती भल्या पहाटे ३-४ वाजता घरात बंद खोलीत किंवा एखाद्या दूर एकांत स्थळी मिळू शकते. 'गुहाया निहितं विभ्राजते' याप्रमाणे अंत:करणातील गुंफेमध्ये तेवणाऱ्या प्रकाशाला पाहाण्याची पात्रता प्राप्त करण्यासाठी अशा प्रकारे ध्यान धरणे, आवश्यक आहे. 'अंतरी उगवला भानू' म्हणजेच अशा प्रकाशाची प्राप्ती होय. बरेच जण अशा गोष्टींना नॉनसेन्स म्हणतात, आणि तेही योग्यच आहे. कारण ते इंद्रियजन्य (सेन्स ऑर्गन्स) अनुभवाच्या वर आहे म्हणजेच इंद्रियातीत आहे, बियाँड सेन्स आहे, त्याला सेन्सीबल कसे म्हणता येईल? जगाला एककाशिवाय असलेल्या केवळ शून्यामध्ये कधीच अर्थ वाटत नाही. एक ही रोकड असते. शून्य हे शून्यच असते; नव्हे, शून्य असतेच कुठं? अध्यात्माची सुरुवात या शून्यतेची अव्यवहारी प्रीती मिळवण्यापासून होते.

शब्द हा द्विदल बीजासारखा आहे. त्याचा जेव्हा विस्फोट होतो, तेव्हा एका बाजूला अर्थ आणि दुसऱ्या बाजूने ध्वनीचा उद्भव होतो. अर्थाचा विस्तार व्यवहारी प्रदेशात होतो तर ध्वनीचा विस्तार आनंदाच्या प्रदेशात होतो. शब्दाची अभिव्यक्ती दोन प्रकारची आहे. आविष्कार आणि तिरस्कार! अवि: म्हणजे प्रकाश आणि तिरसू म्हणजे अंधार. जेव्हा आपण कोणाचा सत्कार करतो तेव्हा आपण प्रकाशात असतो आणि कोणाचा तिरस्कार करतो, तेव्हा आपणच अंधारात असतो.

शास्त्राने वाणीचे चार वर्ण सांगितले आहेत-परा, पश्यन्ती, मध्यमा आणि वैखरी. परा ही सर्वोच्च आसनावर आहे. माणसाची निर्मल अंत:भूमी जेव्हा त्याला अनुभवाच्याही पलीकडे घेऊन जाते, त्या वेळी वाणीतून जो उद्गार बाहेर पडतो ती परावाणी. हा वाग्देवतेचा प्रसाद आहे. त्यानंतर पश्यन्तीचे स्थान आहे. क्रांतदर्शी कवीची अंत:स्फुरणा ज्या वाणीतून प्रकट होते, ती पश्यन्ती. अनुभवजन्य शहाणपणातून व्यवहारी शब्द बाहेर पडतात,

ती मध्यमा आणि जीभेच्या टोकावरून लाह्या फुटाव्यात तशी बेफाम बाहेर पडणारी आणि कोणाच्याही कानात घुसणारी अशी जी वाणी, ती वैखरी. हा वाणीचा वर्णाश्रम धर्म.


मार्शल मुक्लुदान यांनी म्हटले आहे की आता जगामध्ये 'श्रवणयुग' येत आहे. इथरच्या आकाशातून शब्द साऱ्या जगाला व्यापून येत आहेत. त्या आकाशातून शब्दाला खाली उतरवून घेण्यासाठी रेडिओसारखी इलेक्ट्रॉनिक बैठक जरुरी झाली आहे. श्रुतींच्या द्वारे कानाकानांतून साठवलेला ऋषींचा शब्द हा केवळ अर्थापुरता मर्यादित नव्हता. तो त्या ऋषींनी मिळवलेल्या योगजदृष्टीचा प्रसार होता. अप्रदूषित असा उद्‌गार होता. माणूस स्वार्थासाठी शब्दांचा अर्थ सोयीप्रमाणे बदलू लागतो. तेव्हा शब्दब्रह्माचे पावित्र्य आणि सौंदर्य नाहीसे होते. हे सौंदर्य नाहीसे व्हावे, याचे दु:ख आज माणसाला नाही. परिणामी प्रत्यायन (कम्युनिकेशन) भ्रष्ट होत आहे. शब्दामागचे चारित्र नष्ट होते आहे. मौन आणि ध्यान यांच्या साहाय्याने या चारित्र्याला जपावयास हवे आहे. ध्यान धरण्यासाठी देवाची आवश्यकता असते असं नाही. देव म्हणतात तसे काही अस्तित्व नसेलही परंतु त्या अस्तित्वाची लय शोधण्याचा प्रयत्न म्हणजेच जीवनसाधना.

जवळजवळ सहा हजार वर्षांपूर्वी मध्य आशियामध्ये स्थलांतर करून येणाऱ्या आर्यांची एक टोळी इराणमध्ये जाऊन राहिली. दुसरी एक टोळी अफगाणिस्तानात उतरून सिंधुनदी पार करून गंगा-यमुनेच्याकाठी येऊन स्थिर झाली. ही भूमी अत्यंत सुपीक होती. येथील हवा स्फूर्तिदायी आणि सुंदर होती. येथील रमणीय निसर्गाच्या सहवासात आनंदाने आणि विस्मयाने काठोकाठ भरलेल्या हृदयातून जे उद्‌गार उमटले, त्यात प्रशंसा, आराधना आणि आभार या भावना व्यक्त झाल्या. पूर्वेकडून वर येणारे सूर्यबिंब पाहून माणसाला आनंदाबरोबरच आश्चर्यही वाटले. त्यानंतर सूर्याविषयी चिंतन करताकरता त्याला सृजनहार (सवित), पोषण करणारा (पूषन्), तेजस्वी अग्निस्वरूप (हिरण्यरेतस) अशी विशषणे त्याच्या वर्णातून उमटली. हा आश्चर्योद्‌गार आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रारंभबिंदू म्हणता येईल. वैदिक रचनेत विचार आणि दर्शन व्यक्त करणाऱ्या रचना 'मंत्र' म्हणून ओळखल्या गेल्या. वेदांतल्या ब्राह्मण विभागातून उपनिषदांची निर्मिती होते.

◆



## पुस्तकाच्या पानांतून




# शार्लटन्स

**रॉबिन कुक**

अनुवाद

**उज्ज्वला गोखले**

*तीन रुग्णांच्या मृत्यूच्या संशयाची सुई आहे ॲनेस्थेसियालॉजिस्ट डॉ. एवा लंडनकडे... तिचं व्यक्तिमत्त्व गूढ... रेसिडेन्ट डॉक्टर नोहाचा त्या गूढापर्यंत पोचण्याचा चित्तथरारक प्रवास*

गुरुवार, २४ ऑगस्ट, दुपारी १.५३ वाजता

आपलं एकुलतं एक जॅकेट घालून, त्यावर आपला एकमेव टाय लावून नोहा स्टॅनहोप इमारतीच्या फिरत्या दारातून आत शिरला. शेवटी अनेक आठवड्यांच्या उलघालीनंतर आपल्या सर्जिकल रेसिडेन्सीला कायमचा पूर्णविराम मिळणार की काय या भीतीने जीव अर्धा झाल्यावर,

आता आपल्याला पूर्वीच्याच पदावर परत काम करता येणारंय हा विश्वास त्याला वाटायला लागला होता. काल ती सर्जिकल रेसिडेन्सी ॲडव्हायझरी बोर्डाची खतरनाक मीटिंग होती; पण ती जितपत अपेक्षित होती तितपत व्यवस्थित पार पडली होती. आठ सदस्य मीटिंगला हजर राहिले होते. प्रोग्रॅम डायरेक्टर डॉ. कँटर, दोन असिस्टंट प्रोग्रॅम डायरेक्टर्स, डॉ. मॅसन आणि डॉ. हिरोशी आणि रेसिडेन्सीच्या प्रत्येक वर्षाचा एक असे निवडून आलेले पाच सर्जिकल रेसिडेन्ट्स प्रतिनिधी उपस्थित होते. नोहाची खुर्ची तेवढी रिकामी होती; पण ते समजण्यासारखं होतं. रेसिडेन्ट असताना दर वर्षी त्याने ते पद भूषवलं होतं.

सुरुवातीला नोहा जरा भेदरला होता; पण मग त्याला जे प्रश्न विचारले गेले त्यावरून त्याला कळून चुकलं की, त्याच्या वकिलाने, जॉन कॅव्हेंडिशने, सगळं स्पष्ट केलं होतं. नोहाने थिसिसमध्ये कुठल्याही प्रकारच्या माहितीची हेराफेरी केलेली नव्हती, तर शेवटच्या काही प्रयोगांच्या निष्कर्षांचा अंदाज व्यक्त केला होता आणि तोही जरा जपूनच मांडला होता. नंतर खरी माहिती हातात आल्यावर, लगेच त्याने आपल्या थिसिसमधला हा अंदाज काढून टाकून तिथे खरी अनुमानं लिहिली होती. हे करण्यामागचा त्याचा हेतू स्वच्छ होता. मेडिकल स्कूलचा अर्ज दाखल करताना त्यासोबत आपल्या पीएच.डी.चाही विचार व्हावा, असं त्याला वाटत होतं. मीटिंगच्या शेवटी नोहाला सांगितलं गेलं होतं की, त्याच्या केसवर मतदान घेण्यात येईल आणि निकाल जाणून घेण्यासाठी त्याने चोवीस तासांनी परत यावं.

मीटिंग जवळ जवळ तासभर चालली; पण नोहासाठी आश्चर्याची गोष्ट म्हणजे, डॉ. मॅसन संपूर्ण वेळ मूग गिळून बसले होते. नोहाला केयॉन आणि जॉर्जने आधीच सांगितलं होतं की, त्यांना डॉ. मॅसनच्या गमतीजमतीसुद्धा कळल्या आहेत. त्या उघड झाल्यास डॉक्टरांना भारी पडू शकतात. या हुकमाच्या एक्क्याबद्दल डॉक्टरांना रास्त कल्पना दिली गेली होती. तरीही आपल्या या जानी दुश्मनाकडून काही ना काही प्रहार केले जाणार, अशी नोहाची अपेक्षा होती. प्रत्यक्षात तसं काहीच घडलं नाही. याचं कारण त्याला आदल्या रात्री एवाच्या घरी गेल्यावर कळलं.

नेहमीप्रमाणे त्यांनी तिच्या बागेचा देखावा बघत जेवण उरकलं. त्या वेळी एवाने, केयॉन आणि जॉर्जला काय कळलं होतं ते त्याला सांगितलं.

गेल्या काही वर्षांत डॉ. मॅसनने एक पायंडा पाडला होता. एमिरेट्स आणि सौदी अरेबियातून स्वादुपिंडाच्या कॅन्सरने पीडित जे अरब शेख त्यांच्याकडे उपचारांसाठी यायचे, त्यांनी डॉक्टरांना दर भेटीत जास्तीत जास्त किमती भेटवस्तू दिल्या, तर त्यांना डॉक्टरांच्या अपॉइन्टमेन्ट्स व्यवस्थित वेळेवर मिळायच्या. या उपचारांसाठी डॉक्टरांनी त्यांना ठरलेल्या वेळापत्रकानुसार तपासणं गरजेचं होतं. प्रारंभी भेटीदाखल त्यांच्या संशोधनकार्यासाठी किंवा हॉस्पिटलच्या इमारत प्रकल्पासाठी भली मोठी देणगी वगैरे यायची; पण मग सहा-सात वर्षांपूर्वी या भेटींना व्यक्तिगत स्वरूप प्राप्त झालं. त्यांची आवडती, चकाचक लाल रंगाची फेरारीसुद्धा, अशीच भेट म्हणून मिळालेली होती.

केयॉन आणि जॉर्जने काही करसल्लागार तज्ज्ञ वकिलांची भेट घेतली होती. आयआरएसच्या दृष्टिकोनातून, या भेटी म्हणजे डॉक्टरांची मिळकत होती. त्यांची अपॉइन्टमेन्ट मिळावी म्हणून या भेटी दिल्या गेल्या होत्या, म्हणजेच तो त्यांच्या उपचारांचा मोबदला होता. ही डॉक्टरांची फी होती. हे काही त्या रुग्णांनी आपणहून खुश होऊन दिलेलं दान नव्हतं. या आर्थिक व्यवहाराची एकूण व्याप्ती डॉक्टरांच्या शैक्षणिक कामासाठी मिळणाऱ्या पगाराच्या पंचवीस टक्क्यांहून जास्त होती. त्यामुळे कायद्यानुसार ही लबाडी फार गंभीर ठरत होती आणि यासाठी तुरुंगवासाची शिक्षा होती. ही माहिती डॉ. मॅसनच्या कानावर घालण्यात आली होती आणि त्यांना डॉ. नोहा रोथॅजरला पिडणं थांबवायची विनंती करण्यात आली होती.

नोहाने स्टॅनहोपच्या लिफ्टने तिसरा मजला गाठला. तिथे पोचल्यावर खालच्या मुलायम कार्पेटवरून चालत, तो काल जिथे ॲडव्हायझरी बोर्डाची मीटिंग झाली होती त्या हॉस्पिटलच्या बोर्डरूमकडे गेला. या हॉलचं शिसवी लाकडाचं भव्य दार बंदच होतं. त्याने तिथेच बसलेल्या, हॉस्पिटलच्या प्रेसिडेन्टच्या सेक्रेटरीला आपण आल्याचं सांगितलं आणि तो तिथल्या लाउंजमध्ये बसला. दुपारचे १.५८ झाले होते. त्याला वेळ कसोशीने पाळायची होती. उशीर तर अजिबात होऊ द्यायचा नव्हता. आपण इतके वेळेवर पोचलो यासाठी त्याने स्वत:चीच पाठ थोपटली. आत्ताच्या मीटिंगमध्ये जे घडेल त्याबद्दल इतका वेळ तो आशावादी होता; पण आता अशी आत जाण्याची प्रतीक्षा करत असताना, त्याच्या मनात दडून बसलेली अधिकारी व्यक्तींबाबतची भीती उफाळून आली. आपल्या आयुष्याचं निधानच हिरावून

घेतलं जाईल, अशीही शक्यता त्याला भेडसावत होती. भीतीवर काबू मिळवत त्याने थरथरत्या हातांनी समोरच्या टेबलावरचं एक मासिक उचललं.

रात्रीच्या जेवणानंतर आणि डॉ. मॅसनच्या करबुडवेपणाच्या गौप्यस्फोटानंतर, नोहा आणि एवा तिच्या अभ्यासिकेत गेले होते. गेला संपूर्ण आठवडा तो तिथेच मुक्काम ठोकून होता. रोज रात्री ते अभ्यासिकेत जाऊन चर्चा करायचे. काल जेव्हा आता झोपावं, असं त्यांच्या मनात आलं तेव्हा नोहा म्हणाला की, तिच्या बेबीसीटर्सच्या संदर्भात त्याची एक अट आहे. त्याने आपलं मन मोकळं केलं, तेव्हा एवाने त्यावर विचार करायला लागेल असं म्हटलं; पण मग अर्ध्या तासात तिने थोड्याशा नाखुशीनेच त्याला मान्यता दिली.

''तू जाऊ शकतोस आत,'' त्याच्या विचारांना खीळ घालत सेक्रेटरीने सांगितलं.

नोहा उठला. त्याने टाय नीट केला. एक दीर्घ श्वास घेतला आणि तो बोर्डरूमच्या त्या भव्य दाराकडे निघाला. तिथे गेल्यावर तो थबकला. त्याने पुन्हा एक मोठा श्वास घेतला आणि आत पाऊल टाकलं. त्या प्रशस्त टेबलाच्या दुसऱ्या कडेला आता फक्त, डॉ. कँटर, डॉ. मॅसन आणि डॉ. हिरोशी हे तिघंच बसले होते. त्याला जरा आश्चर्य वाटलं. नोहाच्या सहकर्मचाऱ्यांपैकी कुणीच नव्हतं. नोहाच्या हृदयाचा एक ठोका चुकला. आपल्याला उगीचच आधीच आशा वाटली, असं त्याच्या मनात आलं. त्याने मागचं दार बंद केलं आणि तो टेबलापाशी आला. ते तीन अध्यापक सदस्य, म्हणजे अॅडव्हायझरी बोर्डाची एक्झिक्युटिव्ह कमिटी होती.

''परत आलास त्याबद्दल धन्यवाद. हवं तर बसू शकतोस,'' डॉ. कँटर म्हणाले.

''मी ठीक आहे,'' नोहा म्हणाला. त्याने प्रत्येकाकडे पाहिलं. डॉ. मॅसनने त्याच्या नजरेला नजर द्यायचं टाळलं. ते टेबलावरच्या आपल्या हातांचं निरीक्षण करण्यात मग्न होते.

''अॅडव्हायझरी बोर्डाच्या निर्णय प्रक्रियेत एकजण तटस्थ राहिला; पण बाकीच्यांनी एकमताने ठरवलं की...'' डॉ. कँटर औपचारिकपणे बोलत होते, ''तुला सुपर चीफ रेसिडेन्ट या पदावर पुन्हा रुजू करून घ्यायचं.''

नोहाचा अडकलेला श्वास सुटला. सुटकेची एक लहर त्याच्या अंगभर पसरली. हा आवेग इतका भन्नाट होता की, आधारासाठी त्याला समोरच्या

खुर्चीची पाठ पकडावी लागली. तो थोडा पुढे झुकला.

''परंतु,'' डॉ. कँटर पुढे म्हणाले, ''आम्ही वैद्यकीय क्षेत्रातली अध्यापक मंडळी व्यावसायिक नीतिमत्तेला किती मानतो हे तुझ्या मनावर बिंबावं, असं आम्हाला वाटतं. स्वार्थापोटी किंवा इतर कुठल्याही हेतूने नीतिमूल्यांना तिलांजली दिलेली चालेल असा काही तुझा गैरसमज होऊ नये, शिवाय...''

आता नोहाचं डॉ. कँटरच्या बोलण्यावरचं लक्षच उडालं होतं. तो मनाने सर्जरी विभागात पोचलाही होता. तिथलं सकाळच्या ऑपरेशन्सचं वेळापत्रक पाहून घ्यायला हवं होतं. त्याप्रमाणे मदतीसाठी रेसिडेन्ट्सच्या ड्यूटीज व्यवस्थित लावल्या गेल्या आहेत ना, हे तपासणं आवश्यक होतं. नंतर त्याला सर्जिकल इन्टेन्सिव्ह केअर युनिटमध्ये राउंड घ्यायचा होता. तिथल्या केसेसची सद्य:स्थिती जाणून घेणं आवश्यक होतं. मग सर्जिकल मजल्यावर फेरी मारायची होती आणि तिथल्या केसेस समजून घ्यायच्या होत्या. पुन्हा एकदा या प्रवाहात सामावून जाण्यासाठी, त्याला कंबर कसून कष्ट घ्यावे लागणार होते.

''डॉ. रोथॅजर, आम्हाला आमच्या प्रश्नाचं उत्तर हवंय,'' डॉ. कँटर म्हणाले.

''माफ करा,'' नोहा साफ बावचळला होता. ''पुन्हा काम करायची संधी मिळतेय याचा मला इतका आनंद झाला की, सगळं सुरळीत व्हावं म्हणून मला काय काय करावं लागेल त्याचाच विचार करायला लागलो मी. सॉरी, पण मी तुमचा प्रश्न ऐकलाच नाही. पुन्हा विचारता का प्लीज?''

''प्रश्न असा आहे की, आणखी कुठल्या बाबतीत असं नीतिमत्तेशी तडजोड वगैरे, काही घडलंय का, म्हणजे बोर्डाला तसं काही सांगायचंय का तुला? आत्ताचा हा तुझ्या थिसिसच्या संदर्भातला मुद्दा अचानक आमच्यासमोर आला. आम्हाला धक्काच बसला हे समजल्यावर आणि आम्हाला असे धक्के आवडत नाहीत. विशेषत:, आमच्या सुपर चीफशी निगडित काही असलं तर नाहीच नाही; कारण आम्ही त्याला स्टाफमध्ये सामावून घ्यायचं म्हणतोय.''

अचानक नोहाच्या मनात भावनांचं वादळ उठलं. तो आपल्या प्रोग्रॅम डायरेक्टरकडे नुसता बघतच राहिला. त्याला बरंच बोलायचं होतं; पण कसं बोलणार? आपण कसे कात्रीत सापडलोय हे त्याला सांगायचं होतं. एकीकडे

होता, एक उद्योग- व्यवसाय ज्याविषयी त्याला फक्त तिरस्कार वाटायचा आणि दुसरीकडे होती, एक स्त्री जिच्यावर आपलं प्रेम आहे असं त्याला वाटायचं. आपला भूतकाळ आणि भविष्यकाळ यांच्या कचाट्यात तो अडकला होता. जुन्या पठडीतली नीतिमूल्यं आणि सतत विकसित होत जाणाऱ्या तांत्रिक आणि तद्नुषंगिक विश्वाचं नवीनच वास्तव. वस्तुस्थिती आणि आभास यांची सरमिसळ. काहीच उमगत नव्हतं.

''काय मग?'' डॉ. कँटर काही पिच्छा सोडत नव्हते.

''माहिती नाही,'' चाचरत चाचरत नोहा म्हणाला.

''डॉ. रोथॅजर,'' डॉ. कँटरचा स्वर तीव्र झाला. ''हे उत्तर ऐकायचं नाहीये आम्हाला. माहिती नाही म्हणजे काय?''

नोहाने मोठा सुस्कारा टाकला. फुग्यातली हवा जाताना होतो तसा आवाज झाला. ''मी बसतोच जरा,'' त्याच्या पायांतलं बळच गेलं होतं अचानक. त्याने पुढ्यातली डायरेक्टरची खुर्ची ओढली आणि तो धपकन बसला. एक प्रदीर्घ श्वास घेऊन त्याने वर पाहिलं, तर इतरांप्रमाणेच डॉ. मॅसन त्याच्याकडे एकटक बघत होते. फक्त त्यांच्या डोळ्यांत एक अपेक्षेची चमक होती आणि ओठांवर अस्फुट हसू. वेळ निघून चाललाय हे नोहाला जाणवत होतं आणि त्यामुळे त्याच्या काळजात कळ उमटत होती. प्रत्येक जात्या क्षणामुळे परिस्थिती आणखीनच बिकट होत चालली होती. त्याने तत्काळ 'नाही' म्हणून विषय संपवायला हवा होता; पण त्याला ते जमलं नव्हतं. हा प्रश्न इतक्या अनपेक्षितपणे अंगावर कोसळला होता की, त्यामुळे तो पूर्णपणे गांगरून गेला होता. इतका वेळ त्याने कसाबसा आपल्या मनाचा तोल सावरला होता, तो आता पुरता ढळला आणि विचारांचा गुंता झाला.

''डॉ. रोथॅजर, काय ते स्पष्ट बोला.''

नोहाने घसा खाकरला आणि जरा सावरण्याचा प्रयत्न केला. त्याच्या शिणलेल्या आणि बावरलेल्या मेंदूतून एक अफलातून कल्पना साकारत होती. ''हे थिसिसचं प्रकरण अचानक समोर आलं आणि मलाही धक्का बसला,'' तो अडखळतच बोलत होता; पण हळूहळू त्याचा आत्मविश्वास वाढायला लागला, ''मी लहान असल्यापासून, म्हणजे टीनएजपासून मला जी एक अनामिक भीती वाटायची, ती यामुळे उफाळून आली. एक उत्तम अकॅडमिक सर्जन बनण्याची माझी क्षमता असूनही, अचानक काहीतरी आड

येईल आणि माझं हे स्वप्न धुळीला मिळेल. माझ्या थिसिसच्या बाबतीत मी जे काही केलं, तिकडे मी कधी नैतिकदृष्ट्या पाहिलंच नाही; पण आता माझ्या लक्षात येतंय की, हा नैतिकतेचा मुद्दा ठरू शकतो. मी स्वतःहून हे सगळं सांगितलं नाही, स्पष्ट केलं नाही, त्याबद्दल क्षमा मागतो; पण हे सगळं झालं, तरी आणखी एक गोष्ट आहे जिचा नैतिकतेशी जास्त जवळचा संबंध आहे. आता पुन्हा कसलाही गैरसमज नको, म्हणून मला त्याविषयी बोलायला हवं.''

''अवश्य.'' थोड्याशा निराश आणि चिंतायुक्त स्वरात डॉ. कँटर म्हणाले. तेही जरा बिचकल्याचंच दिसत होतं. केवळ औपचारिकता म्हणून विचारलेल्या प्रश्नाने एवढं रान उठेल, असं त्यांना अजिबात वाटलं नव्हतं.

''मी एकदा इंटरनेटवरून एक पेपर विकत घेतला आणि थोडा फेरफार करून तो माझ्या नावावर खपवला. हे योग्य नाही हे मला माहिती होतं; पण ती माझ्या कॉलेज जीवनाची सुरुवात होती आणि उत्तम कामगिरी करून दाखवायचा जबरदस्त ताण होता माझ्यावर.''

आता काहीतरी भयानक ऐकावं लागणार म्हणून डॉ. कँटरचा चेहरा आक्रसला होता, तो थोडा सैलावला. नोहाच्या या तुलनेने निरागस चोरीबद्दल ऐकून त्यांना हायसंच वाटलं. ''बास? एवढंच?'' त्यांनी सुटकेच्या आनंदात विचारलं, ''कॉलेजच्या सुरुवातीच्या दिवसांत तू नेटवरून एक पेपर खरेदी केलास!''

''हो. इतकंच. इतरही अनेक जण असंच करत होते; पण मला माहितीये की हा बहाणा नाही होऊ शकत.''

डॉ. कँटरनी चटकन आपल्या साथीदारांकडे पाहिलं. त्यांनाही या डॉक्टरांइतकंच हायसं वाटलं होतं. त्यांच्या चेहऱ्यावर सगळं समजल्याचा भाव होता आणि एक शिष्टसंमत हसू होतं. ''स्पष्टवक्तेपणाबद्दल आभारी आहे, डॉ. रोथॅजर. कोणत्याही स्तरावरचं वाङ्मयचौर्य खपवून घेणं शक्य नाही हे तर नक्कीच, तरीही या लंब्याचौड्या आणि क्लिष्ट अभ्यासक्रमाच्या सुरुवातीला स्पर्धेचा किती ताण असतो याचा अनुभव आपल्या सगळ्यांनाच आहे. त्यामुळे आम्ही समजू शकतो.'' त्यांनी पुन्हा एकवार बाकीच्या सदस्यांकडे पाहिलं. आपण त्यांच्या वतीने बोलतोय याबद्दल त्यांनी खात्री करून घेतली. डॉ. हिरोशींनी हे मान्य असल्यासारखी मान डोलावली.

''या पहिल्या वर्षातल्या पेपरखेरीज आणखी काही आहे का?'' पुन्हा नोहाकडे लक्ष वळवत डॉ. कँटरनी विचारलं.

''तेवढंच आहे,'' नोहा म्हणाला.


''ठीके तर मग!'' कँटर म्हणाले आणि समाधानाने मागे रेलून बसले. त्यांनी आपले हात टेबलावर पालथे ठेवले होते. ''सगळी किल्मिषं दूर झालेली बरी. थँक्यू आणि स्वागत आहे तुझं. मला माहितीये की, मी माझ्या सहकाऱ्यांच्या वतीने तुला सांगू शकतो की, तू नव्हतास तेव्हा इथे तुझी उणीव फार जाणवली.''

''थँक्यू, डॉ. कँटर,'' नोहा डगमगत्या पावलांनीच उठला. एक सेकंद त्याने डॉ. मॅसनकडे नजर टाकली. त्याचा हा आत्तापर्यंतचा नंबर एकचा शत्रू डॉ. कँटरइतका समाधानी दिसत नव्हता हे तर उघड होतं; पण तो निदान गप्प तरी बसला होता हेही नसे थोडके.

कुणाचा निरोप घेणं तर दूरच, मागे वळूनही न बघता नोहा लटपटत्या पावलांनी दाराकडे गेला. आपण धावत्या ट्रेनखाली येता येता वाचलो, असं त्याला वाटत होतं. सुटका झाली असली तरी डॉ. कँटरच्या अनपेक्षित आणि मानसिक मोहोळ उठवणाऱ्या नैतिकतेच्या प्रश्नाने जो धक्का बसला होता आणि जे विचारचक्र सुरू झालं होतं, त्यातून सावरणं जरुरीचं होतं. अर्थात, आता त्याच्या या मन:स्थितीवर उत्तम उतारा उपलब्ध होता. तो सरळ ऑपरेशन थिएटरकडे जाणार होता आणि स्वत:ला कामात बुडवून घेणार होता.

◆

## पुस्तकाच्या पानांतून







# समर्थ

**मंजुश्री गोखले**

*रामदासांचं 'समर्थ'पण अधोरेखित करणारी कादंबरी*

कललेली उन्हं. सूर्य संथ गतीनं मावळतीकडं सरकत होता. शेतातली कामं हळूहळू आवरती घेत बळीराजाही आता घरी परतायच्या विचारात होता. घराघरातून संध्याकाळच्या स्वयंपाकासाठी चूल पेटवायची तयारी सुरू झाली होती. मंदिरातून सायंकाळच्या आरतीची सिद्धता होऊ लागली होती. मावळतीकडं सरकणाऱ्या सूर्याकडं नजर ठेवून पक्षिगण घरट्याकडे ये-जा करत होते. नदीच्या घाटावर काही बायका संध्याकाळच्या कामासाठी लागणारं पाणी भरायला आल्या होत्या. बैलगाडी ओढणाऱ्या बैलांनाही घराकडं परतायची ओढ लागली होती; पण त्यांचा धनी

अजून शेतातच काम आवरण्यात गुंग होता. त्यामुळे ते पुढ्यातला चारा खाऊन रवंथ करत बसले होते. जसजसा दिवस कलत होता, तसतसे हात, पाय, पंख वेगानं चालत होते; कारण एकदा सूर्य मावळला की सुरू होणार होतं अंधाराचं राज्य. मग मात्र सगळ्या कामांना खीळ बसणार होती.

आता थोड्या वेळातच अंधार पडायला सुरुवात होणार होती. म्हणून तर राणूआईचा जीव थाऱ्यावर नव्हता. अंधार पडल्यावर पोराला शोधणंही अवघड होतं. अजून थोडा प्रकाश आहे, तोवर ती अख्खा गाव भिरभिर हिंडत होती. सगळी गल्ली पालथी घालून झाली. मंदिरात सगळीकडे शोधून झालं. नदीचा काठ धुंडाळून झाला. गावाबाहेरची आमराई धांडळून झाली. सूरपारंब्या, गोट्या, हुतूतू खेळायच्या रोजच्या जागा पिंजून झाल्या. व्याकूळ आशंकेनं विहिरी, नाले बघून झाले; पण... पण नारबा कुठंच नव्हता. कुठंच त्याचा पत्ता नव्हता. त्याला बाहेर खेळतानाही कुणी बघितलं नव्हतं. त्याच्या मित्रांना तो कुठाय हे माहीतच नव्हतं. गल्लीतही तो कुणाला दिसला नव्हता. त्याला नदीकडं जातानाही कुणी पाहिलेलं नव्हतं. राणू आईचा जीव उडून गेला. घशात आवंढा दाटायला लागला. तसं डोळ्यांत पाणी मघापासूनच भरायला लागलं होतं; पण आता ते डोळ्यांतली चिंता, काळजी, भय, अशुभाचं सावट आणि दु:ख घेऊन गालावर ओघळायला लागलं. रुसलेल्या, रागावलेल्या या पोरानं कुठं उडीबिडी तर...! अशुभाच्या या शंकेनं राणू आईचा धीर सुटला.

''नारायणा ऽऽऽ!! अरे नारबा! माझ्या बाळा कुठं आहेस तू? कुठं गेलायस रेऽऽ! ये रे राजा! अरे आपल्या आईवर असं रागवतं का कोणी? कुठं शोधू मी आता तुला? ये रे पोरा! नको असा आईला त्रास देऊस! नारायणा, पोराऽऽ! नारबा! नारायणाऽऽ!''

आता त्या माउलीनं हाकांचा सपाटा लावला. अशा हाका मारत जवळपास सगळं गाव हिंडून झालं. होतंच केवढं ते गाव? सगळा मिळून शंभर-दोनशे उंबरठा होता. राणू आईनं प्रत्येक उंबरठ्यावरून आवाज दिला.

''नारायणाऽऽ! इथे आहेस का रे?''

पण एकाही उंबरठ्याआतून प्रतिसाद आला नाही. अख्खा गाव पालथा घालून राणू आई घरी परत आली, तेव्हा अंधारानं आपले हात-पाय पसरायला सुरुवात केली होती. आता मात्र राणू आईचा धीर सुटला.

'कुठं गेला असेल माझा नारायण? त्या एवढ्याशा कारणावरून गाव सोडून तर गेला नसेल? नाही तर नदी-विहिरीत उडी तर मारली नसेल? आणि तेही एवढ्याशा कारणावरून? काय म्हणावं आता? काय करावं आता? आणि कुठं शोधावं याला? प्रभू रामचंद्रा, कुठं गेलं असेल माझंपोर?'

राणू आईच्या डोळ्यांचं पाणी खळेना. हुंदके देतदेतच तिनं रामरक्षा म्हणायला सुरुवात केली होती–

''रामो राजमणि: सदा विजयते। रामं रमेशं भजे। रामेणाभिहता निशाचरचमू रामाय तस्मै नम: ।। रामान्नास्ति परायणं परतरं रामस्य दासोस्म्यहम्। रामे चित्तलय: सदा भवतु मे भो राम मामुद्धर।।''

एकीकडे सवयीनं रामरक्षेचं उच्चारण होत होतं, तर दुसरीकडं मन आक्रंदत होतं. काय कारण होतं त्याला एवढं रुसायला आणि रागवायला? एवढासा, क्षुल्लक तर प्रसंग! नारायणाचा स्वभाव तसा खोडगुणी. सतत काही ना काहीतरी उपद्व्याप करायचा तो. सूरपारंब्या खेळताना तर त्या झाडाच्या सर्वांत वरच्या फांदीवर टोकाला जाऊन बसत असे आणि तिथून धाड्कन खाली उडी मारत असे. अत्यंत धाडसी होता नारायण. तो खेळायला गेला तरी, राणू आईचा जीव घाबराघुबरा व्हायचा. त्यातच बरोबरीच्या मुलांतलं कुणी पडलं, धडपडलं, कुणाला लागलं; तर तहान-भूक विसरून, वेळकाळाचं भान विसरून त्या पोराची मदत करायला धावायचा. त्या पोराचे आई-वडील त्याला घरी घेऊन गेले, तरी हा त्याचाच विचार करत बसायचा. त्या विचारात जेवायचादेखील नाही. त्या दिवशी असंच झालं. खेळायला गेलेला नारायण अंधार पडल्यावर घरी आला. राणू आई रागे भरली,

''अरे नारायणा, कुठे होतास दिवसभर? घरी आपली आई वाट पाहते आहे याचं काहीच नाही का तुला? करत काय होतास दिवसभर आणि कुठं?''

राणू आईच्या स्वरात राग उतरला होता.

''अगं आई तो गुणाजी आहे ना, तो झाडावरून खाली पडला. माझ्या पाठोपाठ चढत आला शेंड्यापर्यंत आणि पाय निसटला गं त्याचा! आणि पडला खाली! दोन्ही ढोपरांना खरचटलं त्याला. शिवाय खांद्याला मार बसला तो वेगळाच! मग मीच त्याला पाठकुळीवर बसवून त्याच्या घरी घेऊन गेलो. त्याच्या आईला सगळी हकिगत सांगितली. त्याच्या खांद्याला निरगुडीच्या पाल्याचा लेप लावला. पुन्हा नदीवर गेलो. अंघोळ केली आणि

थेट घरी आलो. आई, गुणाजी बरा असेल ना? मला चिंता वाटते गं त्याची. त्याच्या खांद्याला जोरात मार बसलाय.''

चार-पाच वर्षांचा नारायण, आपण दिवसभर काय काय केलं याचा तपशील सांगत होता. क्षणभर आईच्या डोळ्यांत कौतुक उमटलं. तरीही या पोराच्या या असल्या उद्योगाला कुठंतरी अटकाव केला पाहिजे असं तिला वाटलं. लटक्या रागानं ती म्हणाली,

''काय रे नारबा! आई आपली वाट बघत असेल, तिला आपली काळजी वाटत असेल याबद्दल काही वाटलं नाही का? तुला त्या गुणाजीची चिंता वाटतेय. नारायणा, तू असं कर बाबा! सगळ्या जगाच्या कल्याणाचा भार त्या रामरायानं तुझ्यावरच घातलाय. तू जगाची चिंता कर! या विश्वाची चिंता कर! आणि त्यातून वेळ मिळाला, तर आईकडं बघ!''

असं बोलून, नारायणाकडे एक लटक्या रागाचा कटाक्ष टाकून आई आत गेली. जाता-जाता म्हणाली,

''आता पोटाची चिंता वाटत असेल तर जेवायला ये!''

एवढाच! हा एवढाच प्रसंग घडलेला. त्यानंतर नारायणाला जेवायला वाढून आईनं आपलं जेवण उरकलं. गंगाधर, नारायणाचा मोठा भाऊ बाहेरगावी गेला होता. जेवण झाल्यावर झाकपाक करून आईनं माजघरात अंथरूण घातलं. वाड्याच्या मुख्य दाराला कडी-कोयंडा घातला. दाराजवळच्या कोनाड्यात एक पणती तेवत ठेवली आणि ती आत आली. नारायण ओसरीवर बसला होता. दिवलीची वात बारीक करून तिनं नारायणाला निजायला हाक मारली. आता मात्र तिच्या हाकेसरशी नारायण आत आला. येऊन अंथरुणावर निजला. त्याला थोपटता थोपटता आईनं रामरक्षा म्हणायला सुरुवात केली. नारायणाला लगेचच झोप लागली. राणू आई मात्र नारायणाचा विचार करत नंतर बराच वेळ जागी होती.

सकाळी आई लवकर उठली. सडासंमार्जन आटोपून तिनं नारायणाला उठवलं. त्याचे सूर्यनमस्कार, दंड, बैठका, आसनं करून झाल्यावर तिनं त्याला दूध प्यायला दिलं आणि ती पुढची कामं करण्यात गुंतून गेली. त्या वेळी तिला नारायण दिसला होता. त्यानंतर आता दिवस मावळला, रात्र झाली, अंधार पडला तरी नारायणाचा पत्ता नव्हता. सकाळी लोटकी भरून दूध पिऊन झाल्यावर राणू आईला तो दिसलाच नाही. दिवसभर ती कामात

होती. पोतंभर हुलगे पाखडायचे होते. शेतातल्या गड्यानं बबननं आणून दिले होते. उद्या आणखी निघतील म्हणाला होता. त्यामुळं हे काम आजच करून टाकावं या विचारानं राणू आई दिवसभर त्यात बसली होती. नारायण दुपारी जेवायलाही आला नाही. पोर भुकेजलं असेल म्हणून तिनं थोडा वेळ वाट बघितली. मध्ये थोडा वेळ विश्रांती घेऊन तिनं दूध-भात खाऊन घेतला, आणि पुन्हा ती त्या कामाला लागली. तिचं ते काम संपलं, तेव्हा दुपार उलटून गेली होती. तिथली आवराआवर करून ती नारायणाला शोधायला बाहेर पडली; पण सगळीकडं शोधूनही नारायण सापडला नाही. राणू आईचा धीर खचला. दिवली लावून घेऊन ती देवघरात गेली. देव्हाऱ्यात नंदादीप तेवत होता. त्यातलं तेल संपत आलं होतं.

रामरक्षा तोंडानं म्हणतच राणू आईनं तेलाचं ठावकं काढण्यासाठी फडताळ उघडलं. तिनं सवयीनं ठावकं जिथं ठेवलेलं असायचं, तिथं हात घातला. हाताला काहीतरी मऊ-मऊ लागलं.

''अगंबाई ऽ! फडताळात काय आहे हे?'' असं पुटपुटत तिनं दिवली वर उचलली. दिवलीचा मंद प्रकाश फडताळात पडला आणि राणू आईला 'तो' दिसला. तोच तो! नारायण! तो फडताळात बसला होता. ना त्याला अंधाराची भीती वाटत होती, ना काही किडा-मुंगी चावेल याची धास्ती. त्याला तसं फडताळात बसलेलं बघितलं आणि राणू आई ओरडलीच,

''अग्गोऽऽबाई! नारायणा तू? तू इथं फडताळात बसलायस? काय करतोयस इथं बसून?'' आईनं जराशा रागानंच विचारलं. नारायणानं एक कटाक्ष आईकडं टाकला आणि म्हणाला,

''आई, मी विश्वाची चिंता करतोय. तू म्हणालीस ना विश्वाची चिंता कर म्हणून? मग मी इथं बसून विश्वाची चिंता करतोय.''

नारायणानं अत्यंत आत्मविश्वासानं सांगितलं.

''कर्म माझं! अरे नारायणा, गावभर हिंडून तुला शोधून माझ्या पायाचे तुकडे पडले की रे! सकाळी एकदा काय ते दूध प्यायलायस ते मला आता दिसतोयस! काय म्हणायचं तुला? अरे, या फडताळात अंधार आहे, किडा-मुंगी काहीतरी चावेल याचा विचार नाही का आला तुझ्या मनात?'' आईनं जरा रागानंच विचारलं. नारायण शांतपणे फडताळातून खाली उतरला. म्हणाला,

“आई, अगं विश्वाची चिंता करायची, तर या क्षुल्लक गोष्टींचा विचार करून कसं चालेल? आता मला भूक लागलीय. विश्वाची चिंता करायला शक्तीची जरुरी आहे आणि शक्ती येण्यासाठी जेवावंच लागेल. तेव्हा मला जेवायला वाढ!” नारायणानं शांतपणे तपशीलवार उत्तर दिलं.

ती नारायणाची सवयच होती. जशा त्याला अनेक शंका येत असत, तसंच तो कुणी प्रश्न विचारला तर तो त्या शंकेचं निरसनही सविस्तर करत असे. आत्ताही त्यानं आईला सविस्तर उत्तर दिलं. काही न बोलता कपाळावर हात मारून राणूआई उठली. तिनं चुलीवर दूध गरम केलं. नारायणाला एका ताटलीत दूध-भात दिला. म्हणाली,

“आता पोटभर जेव! दिवसभर उपाशी आहेस. जेव आणि आता गपचिप नीज. आता काही उपद्व्याप करू नको अंधारात.”

राणू आईनं दम भरला. नारायणानं नुसती मान हलवली. तरी राणू आई स्वयंपाकघराबाहेर जाता-जाता एक वाक्य तिच्या कानावर पडलंच.

“कशाला आई एवढी अंधाराला घाबरते काही कळत नाही. अंधार म्हणजे तरी काय? सूर्याचा लपंडावच की!”

मागं वळून नारायणाकडं एक कौतुकाचा कटाक्ष टाकून राणू आई माजघरात निजायला गेली. नारायण मात्र शांतपणे एकटाच त्या स्वयंपाकघरात बसून जेवत होता. जेवता-जेवता विचार करत होता की असं फडताळात बसून विश्वाची चिंता करता येणार नाही. त्यासाठी काहीतरी केलं पाहिजे; पण काय करावं हेच त्याला सुचत नव्हतं.

दुसरे दिवशी सकाळी नारायणाचा मोठा भाऊ गंगाधर घरी परतला. तो आल्या-आल्या नारायणानं त्याला विचारलं,

“दादा, विश्वाची चिंता करण्यासाठी काय करावं लागेल?” नारायणाला हा प्रश्न पडलेला बघून गंगाधरला हसूच आलं. चार-पाच वर्षांचा तो आणि निघालाय विश्वाची चिंता करायला. गंगाधरनं त्याचं नाक चिमटीत पकडलं. म्हणाला,

“नारबा, तू आधी आपल्या लंगोटीची चिंता कर! ती निसटत नाही ना? चांगली घट्ट बांधली आहे ना ते बघ! मग विश्वाची चिंता कर!” असं म्हणून नारायणाचा गालगुच्चा घेऊन गंगाधर अंघोळीला गेला.

आता मात्र नारायणाला राग आला. ‘आईला सांगितलं तर तिनंही

हसण्यावारी नेलं. दादाला विचारलं तर त्यानं माझीच चेष्टा केली. ते काही नाही. अजून ही सगळी मला लहान समजतात. आपण मोठे झालो आहोत, हे त्यांना दाखवलंच पाहिजे.' नारायणानं ठरवलं.

''आई, मी नदीवर जातो गं!'' असं आईला मुद्दाम सांगून नारायण घरातून बाहेर पडला.

''लवकर परत ये रे!'' हे आईनं स्वयंपाकघरातून सांगितलेलं त्यानं कानामागं टाकलं, आणि तो पळतच बाहेर पडला. त्यानं थेट नदी गाठली. अंगातला सदरा पळतापळताच काढून त्यानं काठावर टाकला. थेट पाण्यात उडी घेतली. जवळजवळ तासभर तरी तो पाण्यात डुंबत होता. पाण्यातल्या मासोळ्या पायाला येऊन लुचत होत्या आणि हे आपलं खाद्य नाही हे कळलं की दूर जात होत्या. नारायणाला त्याची गंमत वाटत होती. काठावर जाऊन काठावरच्या खापऱ्या[१] गोळा करून, पाण्यात पोहता-पोहता त्या खापऱ्या पाण्याला समांतर अशा भिरकावून पाण्यावर भिंगोऱ्या[२] काढण्याचा त्याचा आवडता खेळ खेळण्यात त्याचे दोन तास कसे गेले हे त्याला कळलं नाही. जेवणाची वेळ झाली, तशी राणू आईला काळजी वाटायला लागली. दोन तास होऊन गेले होते, अजून नारायण नदीवरून परत आला नव्हता. तिचा सगळा स्वयंपाक झाला. तिनं वैल विझवला आणि धुतलेले हात ओच्याला पुसत ती नदीवर धावली. धावताना ती हाकाही मारत होती.

''नारायणा, अरे नारबाऽ! अरे, कुठं आहेस तू?''

तिची हाक पाण्यात उभ्या असलेल्या नारायणाला ऐकू आली, आणि आपला प्रश्न आईनं हसण्यावारी नेला हे त्याला आठवलं. आपल्याला पडलेल्या एवढ्या गहन प्रश्नाची या सगळ्यांनी चेष्टा केली हेही त्याला आठवलं. काही- तरी मनात येत त्यानं नाक दाबलं आणि तो पाण्याखाली गेला. सूर्यनमस्कार, दंड, बैठका, योगासनं यासोबतच तो प्राणायामही शिकलाच होता. पाण्याखाली जाऊन त्यानं श्वास रोखून धरला. आई काठावर येऊन उभी राहिली. एकवार तिनं सगळीकडं नजर फिरवली; पण नारायण कुठंच दिसला नाही. ती कावरी-बावरी झाली. 'आता हे पोर कुठं गेलं? इथं तर कुठंच दिसत नाही!' असा विचार करत ती नारायणाला हाका मारायला लागली.

''नारायणाऽऽ! अरे नारु बाळा! कुठं आहेस तू? अरे, जेवायची वेळ झाली. चल घरी!''

पण तिच्या हाकांना प्रतिसाद आला नाही. आसपास मुलं खेळत होती. राणू आईनं त्यातल्या एकाला विचारलं,

''सहदेव, अरे नारायणाला पाहिलंस काय?'' सहदेव म्हणाला, ''काकू त्यानं मघाशी पाण्यात उडी मारलीय डोहाकडच्या बाजूला! तो अजून वर आलाच नाहीय.''

हे ऐकल्यावर राणू आईचा जीव घाबरा झाला. ''नारायणाऽऽ अरे नारायणा नको रे असा आईला त्रास देऊस! रामराया, माझ्या पोराला सुखरूप ठेव रे बाबा! तुला खडीसाखरेचा नैवेद्य देईन!''

काकुळतीला येऊन आई एकीकडे नारायणाला हाका मारत होती आणि एकीकडे रामरायाचा धावा करत होती. तिचा व्याकूळ स्वर नारायणाला पाण्याखाली ऐकायला आला, तसा चट्कन तो पाण्याच्या वर आला. दीर्घ श्वास घेऊन त्यानं हाक मारली. ''आऽऽई!'' तत्क्षणी आईचं लक्ष तिकडं गेलं. तिनं त्या बाजूला धाव घेतली.

''नारायणाऽऽ बाहेर ये बघू आधी!'' तिच्या स्वरातली व्याकूळता बघून नारायण पाण्याच्या बाहेर आला. धावत जाऊन त्यानं आईच्या कमरेला मिठी मारली.

''आऽऽई! तू मला इथं शोधायला आलीस?'' नारायणानं विचारलं.

''काय करू रे मग? तू तासभर दिसला नाहीस की माझं मन घाबरं होतं बघ! नारायणा, असा कुठं जात जाऊ नकोस रे!''

आपल्या ओच्यानं नारायणाचं चिंब ओलं डोकं पुसत आई म्हणाली.

''मग आई, मी विश्वाची चिंता करण्यासाठी रामरायाला शोधायला गेलो तर तू काय करशील?'' नारायणानं विचारलं.

''तेव्हा मी रामरायालाच तुझा पत्ता विचारेन! त्याला निश्चित माहिती असेल तू कुठं आहेस ते! तो सांगेल मला!'' आईनं उत्तर दिलं. तिच्या उत्तरात ठामपणा तर होताच; पण बोलण्यात होता रामरायावरचा अढळ विश्वास.

''पुरे झालं आता नदीत डुंबणं! आता घरी चल!'' असं म्हणत नारायणाच्या हाताला धरून आई त्याला घरी घेऊन आली.

दोघं घरी आले तर नारायणाचे बाबा घरी आलेले होते. आल्यावर आईनं त्यांना इत्थंभूत हकिगत सांगितली.

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# स्मृतियात्रा

**भा. द. खेर**

*प्रथितयश साहित्यकार, राजकारणी, पत्रकार, इतिहासकार, कवी यांच्या सहवासाच्या आठवणींचा भा. द. खेरांनी रेखाटलेला ललितरम्य आलेख*

### राष्ट्रभक्त योगी ऐसा

करकरीत तिन्हीसांजा झालेल्या असतात. ऐन दिवेलागणीची वेळ असते. घरातल्या अंधाराला टाळून, मी घराबाहेरच्या ओट्यावर येऊन बसतो. 'आनंदी निवास' या माझ्या घरासमोरून दिसणाऱ्या डोंगरकडा आणि डोंगरावरील शेलाटे वृक्ष हळूहळू अंधाराच्या

आवरणाखाली लपेटून जातात. डोळे ताणताणूनही काही दिसेनासं होतं. दृष्टीला काही दिसेनासं झालं म्हणजे कर्णेंद्रिय तिखट बनतं. मग अनाहत ध्वनी ऐकू यायला लागतो.

त्या ध्वनीतून स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या दोन काव्यपंक्ती कानावर येतात...

*'म्या असता दिवस नसे व्यर्थ गमविला*
*दिवसास्ताचेहि म्हणुनि दुःख ना मला'*

अंदमानात मरणोन्मुख शय्येवर असताना सावरकरांना या काव्यपंक्ती स्फुरल्या. मृत्यू हा घरीदारी सावरकरांचा जीवनसाथी बनला होता. अंदमानात असताना तर त्या दोघांची चांगलीच गट्टी जमली होती. तिथे असताना त्यांना मृत्यूचं भय कधीच वाटलं नव्हतं. 'ये मृत्यो' अशी साद त्यांनी मृत्यूला वारंवार घातली होती.

मृत्यू हा सावरकरांचा आवडता विषय होता की काय कुणास ठाऊक!

माझ्या आणि त्यांच्या पहिल्या दर्शनभेटीच्या प्रसंगी तो विषय निघाला होता. तो प्रसंग माझ्या डोळ्यांसमोर आजही उभा राहतो.

सावरकरांचं साहित्य प्रदीर्घ बंदीतून मुक्त झालं होतं. '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' या ग्रंथाच्या प्रकाशनासंबंधी बोलणी करण्यासाठी आम्ही सावरकर सदनात गेलो होतो. सकाळची वेळ होती. त्या रामप्रहरात बोलण्यावरून बोलणं निघालं. मार्सेलिसचा विषय निघाला. त्रिखंडात गाजलेल्या सावरकरांच्या त्या उडीबद्दल आम्हा तरुणांना केवढं आकर्षण वाटायचं. त्या उडीवरूनच बोलणं निघालं असावं.

मला एकेक गोष्ट आठवायला लागली...

मार्सेलिसच्या किनाऱ्याला लागलेली 'मोरिया' बोट, त्या बोटीचं अरुंद पोर्टहोल, मध्यरात्रीचा घनदाट अंधार, मॅझिनीला स्मरून अथांग सागरात झोकलेली उडी, त्या सागरसंगरात कानावर पडणारे पिस्तुलांचे बार, इंग्रजी शिकारी कुत्र्यांनी केलेला पाठलाग आणि शेवटी घडलेलं चित्तथरारक शोकपर्यवसायी नाट्य... या साऱ्या घटनांचा चलच्चित्रपट माझ्या मनासमोरून सरकत असतानाच एखाद्या विराट सभेत बोलावं त्याप्रमाणे तात्याराव बोलत होते... ''अरे, मृत्यूचं तर मला कधीच भय

वाटलं नाही. आम्ही कधीच मृत्यूला घाबरलो नाही. उलट मृत्यूच आम्हाला घाबरला. त्यानंच आम्हाला चकवलं, चुकवलं. पळून गेला आमच्यापासून दूर! पुढे अंदमानात तर त्याचीच सतत सोबत होती; पण तिथेही शेवटी त्यानं आमची सोबत सोडली.''

मग क्रांतीचं आद्य तत्त्व सांगताना ते पुढे म्हणाले,''ज्याला मरणाचं भय वाटतं त्याच्या हातून कोणतंच क्रांतिकार्य कधी होत नसत. मदनलाल धिंग्रा जेव्हा हौतात्म्य पत्करायला सिद्ध झाला, तेव्हाच त्याच्या हातून ते क्रांतिकार्य पार पडलं. अरे, आम्ही स्वातंत्र्याची समरगीतं गायली ती फाशीच्या तख्तावरूनच! मृत्यूच्या मांडीवरूनच!''

मला त्यांचं मृत्यूविषयीचं तत्त्वज्ञान आठवलं. आजही ते आठवतं.

मरण ही एक सुषुप्ती आहे. जीवन हा दिवस आहे आणि मृत्यू हे केवळ रूपांतर आहे. दिवसानंतर रात्र येते आणि रात्रीनंतर दिवस येतो. त्याचप्रमाणे जीवनानंतर मृत्यू आणि मृत्यूनंतर पुन्हा जीवन, हे चक्र अव्याहत चाललेलं असतं.

तात्यारावांनी कित्येकदा सांगितलं आहे– ''क्रांतीच्या जळत्या वेशीतून आम्हाला नेहमीच मृत्यूच्या महाद्वारापाशी जावं लागतं. आधी आम्हाला मरणारी माणसं मिळत नाहीत. आणि मिळाली तर टिकत नाहीत. परंतु कित्येकांना हे कळत नाही की, क्रांतिकार्याची वाटचाल करताना मार्गात मृत्यू हा हमखास भेटतोच, असं नाही. त्या मार्गावरून जाणारा क्रांतिकारक हा निधड्या छातीचा असेल तर कित्येक प्रसंगी मृत्यू भिऊन दूर पळून जातो.''

सावरकरांचा बाबतीत तरी हे खरं ठरलं. मृत्यू त्यांना भ्यायला आणि त्यांच्यापासून दूर पळून गेला. मरणाला अमर करूनच हा मृत्युंजय स्वातंत्र्यवीर जगला.

त्या पहिल्या भेटीनंतर सावरकर सदनातून बाहेर पडताना माझ्या डोळ्यांपुढे लो. टिळकांसमोर उभे रहिले दामोदर चापेकर दिसत होते. त्या वेळचा कॅडेल रोड ओलांडून मी दादरच्या चौपाटीवर जाऊन बसलो. एकटाच. सावरकरांच्या दर्शनानंतर मला सागरतीरावर जाऊन का बसावंसं वाटलं, हे मला आजही सांगता येणार नाही. माझी पावलं सागरतीराकडे

अभावितपणानं वळली, ही गोष्ट मात्र खरी! सागराच्या अथांगपणामुळे म्हणा किंवा सागर हे रत्नाचं माहेरघर मानलं जात असल्यामुळे म्हणा, सागर आणि सावरकर याचं साहचर्य माझ्या मनात त्या वेळी साकार झालं असावं.

दादरच्या चौपाटीवर बसल्यानंतर त्या सागराच्या अमर्याद जलाशयाच्या पृष्ठभागावर मला येरवड्याचं कारागृह दिसायला लागलं. येरवड्यातल्या कोठडीतले टिळक दिसायला लागले. टिळकांच्या समोर दामोदरपंत चापेकर उभे होते.

चापेकर टिळकांना म्हणत होते, ''मी लवकरच फाशी जाणार. आपल्याजवळची गीतेची प्रत मला द्या. फाशीनंतर माझ्या प्रेताला अग्नी देण्याची व्यवस्था आपणच करा!''

दामोदरपंतांना टिळक म्हणाले, ''आपण हिंदू आहोत. आपण मरणाला भ्यायचं कारण नाही. कारण आपण आत्मा अमर मानतो.''

दामोदरपंतांनी उत्तर दिलं, ''मी मरणाला मुळीच भीत नाही. नाहीतर हे कृत्य मी केलंच नसतं!''

त्या वेळी माझ्या मनात विचार आला, या सावरकरांची जातकुळी हीच! फिनिक्स पक्ष्यासारखी! तो पक्षी मृत झाला म्हणजे त्याच्या देहरक्षेतून दुसऱ्या तसल्याच पक्ष्याचा जन्म होतो आणि म्हणून या पक्ष्याचा वंश कधीच खंडत नाही!

चापेकरांची चिता पेटली आणि त्या चितेच्या रक्षेतूनच सावरकरांचा जन्म झाला. सावरकरांनीच स्वत: तसं लिहून ठेवलं आहे. चापेकरांच्या चितेवर बाल-विनायकानं अश्रूंची संततधार धरली; तरी ती चिता कधी विझली नाही. तो अंगार घेऊनच सावरकरांच्या क्रांतिकार्याचा जन्म झाला.

-आणि भविष्यकाळाच्या उदरात त्या वेळी दडलेला योगायोग असा की, चापेकरांप्रमाणेच अंगीकृत कार्य सरल्यानंतर सावरकर मृत्यूला स्वेच्छेनं सामोरे गेले.

त्या दिवशी समुद्राला भरती होती. हळूहळू पाणी पायापाशी येऊन उसळ्या मारायला लागलं. जणू सावरकरांचा क्रांतिकार्याच्या उसळीप्रमाणे!... मला तिथून उठणं भाग होतं. मी उठून उभा राहिलो. माझा पाय तिथून

निघत नव्हता. मी समोर बघत होतो. अथांग सागर समोर पसरला होता. भरतीचा सागर विराट महापुरुषाप्रमाणे भासत होता.

१९५० मध्ये 'सह्याद्रि' मासिकातून 'क्रांतिकारक खटले' ही माझी लेखमाला सुरू झाली. सागर आणि सावरकर याच संदर्भातले शीर्षक मी सावरकरांवरील खटल्याला दिलं होतं- 'अथांग उदधीला आव्हान देणारा आधुनिक अगस्ती!' स्वत: सावरकरांनी या माझ्या शीर्षकाचं फार कौतुक केलं होतं. तेव्हापासून 'सागर आणि सावरकर' या दोघांचं साहचर्य माझ्या मनात पक्कं घर करून बसलेलं आहे.

'१८५७ चे स्वातंत्र्यसमर' हा ग्रंथ आम्ही प्रसिद्ध केला. क्रांतिकारकांची गीता म्हणून मानल्या जाणाऱ्या सावरकरांच्या या ग्रंथाबद्दल आम्ही त्यांना जे मानधन दिलं, त्याची मला आजही लाज वाटते. प्रतिपृष्ठ दोन-तीन रुपये एवढं मानधन आम्ही त्यांना दिलं आणि ते त्यांनी आनंदानं स्वीकारलं. त्या वेळी 'पृष्ठ' म्हणजे नेमकं काय, याचीही कसून खुलासेवार चर्चा केली. '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' यासारख्या विजनवासात काळ कंठलेल्या अलौकिक ग्रंथाबद्दल त्यांना जेमतेम हजारबाराशे रुपये आम्ही देणार होतो. त्यातही आनंद मानून ते म्हणाले, ''अरे, भगतसिंग, सुभाषचंद्र बोस यांच्यासह कित्येकांनी या ग्रंथाच्या सात-आठ आवृत्या काढल्या. त्या वेळी कसलं मानधन आणि कसलं काय? पैशापेक्षा पुस्तकाचा प्रसार हेच आमचं ध्येय होतं. अगदी परवा परवा सुभाषचंद्र बोसांनी हा ग्रंथ प्रसिद्धून सेनेत वाटला. देशस्वातंत्र्याला या ग्रंथाचा थोडाफार हातभार लागलाच की नाही? बस्स! तेवढंच आमचं ध्येय होतं. ते साध्य होतं आहे. तुम्ही हे एवढं मानधन दिलंत ही त्यावर दक्षिणाच म्हणायची!''

यावर आम्ही काय बोलणार होतो?

परंतु आज तेवढ्याच आमच्या कादंबरीला आठ-दहा हजारांवर रुपये मानधन मागण्यात आणि ते स्वीकारण्यात मला तरी लाज वाटते. लाख मोलाचं साहित्य कवडीमोलानं जावं आणि कवडीमोलाचं साहित्य लाखमोलानं मोजलं जावं, हा या जगातला व्यत्यास आहे, विसंवाद आहे. तो विसंवाद

पत्करण्यात अभिमानापेक्षा लाजिरवाणा भाव अधिक असतो.

स्वा. सावरकरांवर लिहिलेल्या ‘यज्ञ’ या आमच्या कादंबरीवर पैशाचा पाऊस पडला. ही भविष्यकाळातली गोष्ट जर त्या वेळी प्रतीत झाली असती तर ते सारं द्रव्य आम्ही त्यांच्याच क्रांतिखाती खचित जमा केलं असतं. निदान आज तरी असं वाटतं. माणसाच्या बुद्धीची खात्री थोडीच देता येणार आहे?

‘स्वातंत्र्यसमर’ हा सावरकरांचा ग्रंथ १९४७ सालच्या १४ जानेवारीला प्रसिद्ध झाला. त्या वेळी डॉ. ना. भा. खरे यांच्या हस्ते टिळक स्मारक मंदिरात माझा सत्कार झाला. बरोबर चौतीस वर्षांनी म्हणजे १४ जानेवारी, १९८१ रोजी मी संपादित केलेला ‘केसरी शताब्दि’ हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. त्याबद्दल टिळक स्मारक मंदिरातच महामंत्री इंदिराजी गांधी यांच्या हस्ते माझा सत्कार झाला. या योगायोगाचं मला आजही नवल वाटतं.

टिळक - सावरकर ही आमची दैवतं! टिळक हे सावरकरांचं दैवत! हे सारे संबंध योगायोगाचे!

१९५२ मध्ये ‘अभिनव भारत’ या सावरकरांनी प्रस्थापिलेल्या क्रांतिकारी संस्थेचा सांगता समारंभ साजरा झाला. देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी याच शतकाच्या प्रारंभी प्रस्थापित झालेली ही क्रांतिकारी संस्था! देशाला स्वातंत्र्यप्राप्ती झाल्यानंतर त्या संस्थेचं विसर्जन व्हायलाच हवं होतं. कार्यारंभी प्रतिष्ठापना केलेल्या श्री गजाननाचं विसर्जन करण्यासारखीच ती प्रथा होती. हा उपचार तात्यारावांनीच निश्चित केला. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी ही संस्था त्यांनीच स्थापन केली आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यांच्याच हस्ते त्या संस्थेची सांगता व्हावी, हाही एक अपूर्व योगायोगच होता.

त्या वर्षीच्या १० मे रोजी ‘केसरी’नं एक विशेषांक प्रसिद्ध केला. त्या अंकाच्या अभ्यागत संपादकाचा मान मला मिळाला. माझ्या लेखी सावरकरांचं कार्य म्हणजे देवकार्य! ‘केसरी’च्या त्या अंकात ‘अभिनव भारताची क्रांतिगंगा’ हा माझा लेख प्रसिद्ध झाला. त्याच्या आधी ‘सावरकर सदनात’ मी अधूनमधून या ना त्या निमित्तानं जायचा. अगदी निमित्त काढून जायचा.

त्या वेळी सावरकरभक्तांच्या मनात एक कल्पना दृढमूल झाली होती. त्यांच्या भक्तांना वाटायचं की, सावरकरांसारख्या कर्तृत्वशाली महापुरुषाच्या पदरात पडावं एवढं यश त्यांच्या पदरात पडलेलं नाही. त्यांचं जीवन म्हणजे अपयशांची एक मालिकाच आहे.

पुण्याच्या साहित्य परिषदेत सावरकरांच्याच सभेत बोलताना श्रीपाद महादेव माटे म्हणाले होते, ''या महापुरुषाजवळ काय नाही? सरस्वतीनं आपला सारा जामदारखाना, नव्हे, भांडार या महापुरुषासमोर मुक्त केलं आहे. आपल्या भांडारातले सारे अंलकार या थोर पुरुषाच्या पायाशी तिनं ओतले आहेत. पण आपलं सारं भांडार तात्यारावांच्या पायाशी ओतण्याच्या वेळी सरस्वती फारच घाईत असली पाहिजे. कारण या विनायकरावांच्या मस्तकी ती यशाचा तुरा मात्र खोवायला विसरलेली दिसते.''

यशापयशाचा हा प्रश्न मी एका भेटीत सावरकरांसमोर मांडला तेव्हा ताडकन् त्यांनी विचारलं, ''यश कशाला म्हणतात?''

यावर मी त्या महापंडिताला काय उत्तर देणार? मग तेच म्हणाले, ''आपल्या राष्ट्राचे दोन तुकडे व्हावेत, असं कुणाला कधी वाटलं होतं का? पण देशाचे दोन तुकडे झाले. देश फाटला! हा आपला पराभव झाला? ते आपलं अपयश ठरलं?''

अरे एवढा तीनचतुर्थांश देश मुक्त झाला... उर्वरित भाग आपण मुक्त करूच करू!''

अवाक् होऊन मी यशापयशाची मीमांसा ऐकत होतो.

एवढ्यानं भागणार नाही म्हणून तात्याराव पुढे म्हणाले, ''पानिपतच्या युद्धात आपला पराभव झाला, असं सारे लोक मानतात. पण तो पराभव होता का? अपयश होतं का? पानिपतची लढाई जिंकून अब्दाल्ली जो मायदेशी परत गेला, तो पुन्हा कधी आलाच नाही. मी तर म्हणतो, तो जेत्यांना जिंकणारा पराभव होता!''

त्याच वेळी मला वाटून गेलं की, सावरकरांसारख्या थोर पुरुषाचं आजचं तथाकथित अपयश हे उद्याचं उज्जवल यश ठरणार असतं. कारण थोर पुरुषांच्या जीवनाला दोन बाजू असतात. वर्तमानकाली व्यतीत होणारं त्यांचं लौकिक जीवन आणि भविष्यकालात प्रतीत होणारं त्यांचं


ऐतिहासिक जीवन । म्हणून थोर व्यक्तींचा जीवनपट तपासताना घाईगर्दी उपयोगाची नाही. असामान्यांच्या जीवनाला सामान्य निकष कधीच उपयोगी पडणार नाहीत.

हे सारे विचार मनाशी घोळवतच मी पुण्याला आलो आणि केसरीतला माझा लेख लिहिला. 'अभिनव भारताची क्रांतिगंगा' या माझ्या केसरीतल्या लेखात मी लिहिलं, 'या जगात यशासारखी यशदायी गोष्ट दुसरी कोणती नाही. ही गोष्ट जरी खरी असली तरी काही अपयशांतदेखील यशाची बीजं सामावलेली असतात.'

सावरकरांचं बोलणं माझ्या मनात ताजं होतं. त्यामुळे आपसुकच लेखाचा प्रारंभ अशा तऱ्हेनं झाला. परतु त्यांचं बोलणं त्यांच्या अभिनव भारताला दाखवायला हवं होतं. म्हणून मी त्या लेखाचा शेवट केला होता, 'अभिनव भारत या क्रांतिकारी संस्थेला अपयश आलं, असं मुळीच मानता येणार नाही. काही पराभव जेत्यांना जिंकणारे असतात. त्याप्रमाणे त्यांचा पराभवच झाला असेल तर त्यांनी जेत्यांना निश्चितच जिंकलेलं होतं. आपल्या क्रांतिकार्यानं त्यांनी शत्रूराष्ट्राशी स्वातंत्र्यसंग्राम प्रारंभित केला होता. कविवर्य बायरन यानं म्हटल्याप्रमाणे स्वातंत्र्याचा हा संग्राम कधीच थांबत नसतो. एकच नव्हे, तर पिढ्या न् पिढ्या हे युद्ध सुरू असतं. समरांगणावर रक्तानं अभिषिक्त झालेला पिता आपल्या हातातला ध्वज सुपुत्राला सुपूर्त करून अखेरचा श्वास सोडतो; परंतु त्या ठिकाणी युद्ध मुळीच संपत नाही... नंतर असा एक सोनियाचा दिवस उगवतो की, त्या वेळी विजयश्री तुम्हाला पुष्पमाला घालते आणि तत्क्षणीच ते युद्ध संपतं. १९४७ मध्ये हिंदी क्रांतिकारकांच्या गळ्यात विजयश्रीनं अशीच माळ घातली आणि त्यांच्या त्या क्रांतियुद्धाची 'अखेरी' झाली. गेल्या पिढीतले लोक 'गंजिफा' नावाचा दशावतारांचा गोल पत्त्यांचा एक खेळ खेळत असत. त्या खेळात 'अखेरी'ला फार महत्त्व असे. ज्याची 'अखेरी' त्याचं यश! त्या गंजिफाच्या डावाप्रमाणे अभिनव भारताच्या या क्रांतिअवतारानं १९४७ मध्ये शेवटी 'अखेरी' मारली

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# सूर भरला अंतरी

**भा. द. खेर**

*भा. द. खेर यांच्या नादमय लेखणीतून उतरलेली विख्यात संगीतकारांची व्यक्तिचित्रे*

### सुजन कसा मन चोरी

**– बालगंधर्व**

हे स्वर्गीय सूर कानांवर पडत होते, पण गाणारी व्यक्ती मात्र दिसत नव्हती. नाट्यगृहातील सारे प्रेक्षक बेभान झाले होते. स्वर्गीय स्वरांची नुसती बरसात होत होती. सारे प्रेक्षक त्या स्वरांचा मागोवा घेत होते. आकाशपुष्पांच्या पायघड्यांवर स्वर्गातल्या गंधर्वाचं तर गायन चाललं नव्हतं ना? पण ही कल्पना नंतरच्या वयातली. कुमार वयात ही

कल्पना कुठली सुचायला? कानावर स्वर्गीय स्वर पडले आणि मन वेडं झालं, एवढं मात्र त्याही वयात जाणवलं. शेजारी बसलेल्या लहानग्या बहिणीकडे बघितलंत पण स्वरांचा उगम सापडला नाही.

'अगं हा -चोरी! यदुकुलनंदन-'

धृपदापर्यंत गाणं आलं, पण गाणारी व्यक्ती काही केल्या दिसत नव्हती. अवघ्या प्रेक्षकांची दृष्टी रंगमंचावर खिळली होती; म्हणून मीही त्याच दिशेकडे बघत होतो. रंगमंचावरील झगमगाटानं हरखून गेलो होतो. जणू शरदातील पौर्णिमेच्या चंद्रकिरणांचा सडा रंगमंचावर पडत होता आणि त्यावर स्वर्गीय पुष्पांची रंगावली रेखली जात होती. अमृतमय स्वरांचं सिंहासन रंगमंचावर मांडलं होतं. परंतु त्यावर विराजमान होणारा स्वरसम्राट मात्र अद्याप दिसत नव्हता. सारी प्रेक्षकप्रजा वेडावून गेली होती.

१९३० साल असेल. नगरचं बागडे थिएटर रसिक प्रेक्षकांनी तुडुंब भरून गेलं होतं. बालगंधर्वांचं नाटक बघणं ही प्रेक्षकांची पर्वणी! अमृतसिद्धी योग! त्या काळी पुण्या-मुंबईला जाऊन बालगंधर्वांचं नाटक बघण्याची हौस परवडण्यासारखी नव्हती. त्यामुळे घरी चालून आलेल्या स्वरगंगेत कर्णेंद्रियांची तृप्ती साधण्याची पर्वणी कोण सोडणार? परंतु आम्ही गंधर्वांच्या नाटकाला आलो होतो ते चोरून! कलावंतांची घराणी असतात. आमचं घराणं 'ललितकलादर्श मंडळीं'चं - म्हणजे बापूसाहेब पेंढारकरांचं! त्यांच्या घराण्याशी आमचं सर्वच दृष्टींनी नातं जडलं होतं. बापूसाहेबांच्या गाण्याशी आमचं जसं नातं, तसंच त्यांच्या मामेबहिणीशी माझ्या चुलत भावाचं जन्माचं नातं जडून गेलं होतं. त्यामुळे रसिकांच्या दृष्टीनं आमचं घराणं बापूसाहेब पेंढारकरांचं! 'गंधर्व कंपनी येणार' अशा जाहिराती फडकल्या तरी ते 'हॅन्डबिल' घरी आणण्याची आम्हाला काही सोय नव्हती. तसं पाहिलं तर लहान वय असूनही हॅन्डबिल वाटणाऱ्या गाडीवानानं चांगली चार-पाच हँडबिलं माझ्या हातात ठेवली होती. पण मी ती घरापर्यंत आणली नव्हती.

परंतु नगरला 'गंधर्व कंपनी' येणार आणि आपलं घराणं निराळं असल्यामुळे आपल्याला त्यांची नाटकं बघायला सापडणार नाहीत, अशी रुखरुख मनाला लागून राहिली होती. गंधर्वांच्या एकापेक्षा एक सुरस अशा रसभरित कथा कानावर पडत होत्या. घरीदारी तोच विषय चालला होता. गावात सर्कस यायची म्हणजे ती येण्यापूर्वीच त्या सर्कशीतील वाघ-सिंहांची लांबी-

रुंदी आम्हाला कळायची. विदूषकांचे किस्से कानावर पडायचे. वाघ-सिंहांच्या जबड्यासमोर निर्भय मुद्रेनं उभ्या असलेल्या मुलीचं चित्र आम्हाला दिसायचं. 'गंधर्व कंपनी'च्या बाबतीतही तोच प्रकार. बालगंधर्वांच्या अनेक गोष्टी अनेकांनी ऐकवल्या. परंतु दोन-तीन गोष्टी चांगल्याच आठवतात. एकदा चैत्रगौरीच्या हळदी-कुंकवाला बालगंधर्व स्त्री वेषात गेले होते आणि हळद-कुंकू घेऊन आले होते. त्यांना कुण्णी कुण्णी ओळखलं नव्हतं. कुठल्या तरी एका नाटकात बालगंधर्व अठरा लुगडी नेसले होते; पण ती लुगडी एवढी तलम होती की एकच लुगडं नेसल्यासारखं वाटत होतं. अर्थात त्या लुगड्यांची संख्या माणसागणिक बदलायची आणि त्या लुगड्याच्या खरेदीचं ठिकाणही बदलायचं. कुणी सांगत की, ही एवढी तलम लुगडी पॅरिस येथून आणलेली असत. कुणाच्या मते, त्यांची बाजारपेठ मँचेस्टर असायची. वर्णन मात्र एक असायचं. लुगडी हवेसारखी पातळ आहेत. आणखी एक किस्सा कानी पडला होता. लय चुकली म्हणून बालगंधर्वांनी रंगपटात आल्यावर एका तबलियाच्या श्रीमुखात भडकावून दिली होती. अर्थात लय चुकणं म्हणजे काय आणि त्यासाठी हातागालाची गाठ पडण्याचं कारण काय, हे कळण्याचं ते वय नव्हतं. कळत होतं ते एवढचं, की तबलियाच्या हातून काही तरी घोर अपराध घडला असला पाहिजे. त्याशिवाय एरवी गरीब स्वभावाचे असलेले बालगंधर्व त्याच्या श्रीमुखात भडकावून देणार नाहीत.

माझे वडील कुठल्यातरी गावाला गेले होते. ती पर्वणी साधून आम्ही बहीण-भावंडांनी नाटकाची पर्वणी साधून घ्यायचं ठरवलं. घराणं सोडून आम्ही दुसऱ्याच घराण्याचं नाटक बघायला गेलो. कावऱ्याबावऱ्या मनानं पिटात बसलो. एवढ्यात स्वर्गीय स्वर कानावर पडले आणि आम्ही भांबावून गेलो. काही वेळानं शोध लागला. उजव्या बाजूच्या 'वुइंग' मधून स्वर बाहेर येत होते; आणि जणू समस्त प्रेक्षकांच्या कानावर कुणाची तरी कागाळी घालावी, अशा आविर्भावात रुक्मिणी सांगत होती – 'अगं हा चोरी! यदुकुलनंदन-'

बालगंधर्व रंगमंचावर आले केव्हा आणि झाडून साऱ्या प्रेक्षकांतून टाळी कडाडली केव्हा याचं भानही राहिलं नाही. मीही हातावर हात ठेवला, पण त्या समस्त तालिकागजरांत माझा चिमुकला ताली-नाद कोठल्या कोठे

लोपून गेला. सारं नाट्यगृह ब्रह्मानंदात डोलू लागलं ते अखेरपर्यंत.

त्या वयात ताल-स्वरांचं फारसं ज्ञान नव्हतं; पण उपजत जाणिवेनं ते स्वर मनावर रेखून ठेवले. आजही मनावर ती ध्वनिमुद्रिका वाजू लागते. अवकाशातून भूपालीचे स्वर उमटल्याचा भास होऊ लागतो. अंगावर रोमांच उभे राहतात. मन थरारून जातं. त्या मनाला राहून राहून वाटतं, की असा 'भूप' आता या कानावर कधी पडणार नाही. असे स्वर्गीय स्वर मनाच्या तबकडीवर कधी ध्वनिमुद्रित होणार नाहीत. एक वेडा हट्ट मनात उगम पावतो – 'सुजन कसा मन चोरी' हे नाट्यगीत कोणी गाऊच नये. बालगंधर्व ते गीत गाऊन गेलेले आहेत. त्या गीताला आता त्या स्वर्गीय स्वरांचा साज कुणी घालू शकणार नाही. खरंच! 'सुजन कसा मन चोरी' हे भूपातल्या एका प्रसिद्ध चीजेचं सुगम आणि गोंडस रूप! ते गोजिरं रूप सामान्यातल्या सामान्य माणसाच्या मनावर ठसवावं, ते एका बालगंधर्वांसारख्या गायकानं! ज्या गांधाराच्या स्पंदनावर साऱ्या भूपरागाचा प्राण चैतन्यमय होतो, तो गांधार सच्चा लागावा, सुरेल निघावा, म्हणून तपंच्या तपं 'रियाझ' करणारे बडे बडे उस्ताद बालगंधर्वांच्या गोड गळ्यातून निघणारा तो स्वयंभू गांधार ऐकून हरखून जायचे. भीमपलासी, देस, तिलककामोद, सारंग, देसकार, मालकंस अशा खानदानी रागरागिणींना मैफलीच्या सासुरवासातून सोडवून जनमानसाच्या अंगणात मुक्तपणानं फुगडी खेळायला लावलं ते नारायणरावांनी! त्यामुळे परंपरेला प्राणापलीकडे जपणाऱ्या गानमहर्षी अलादियाखाँपासून ते कुमार गंधर्वांसारख्या गवयांपर्यंत सारे गवय्ये स्तिमित झाले, नतमस्तक झाले ते एकाच गंधर्वांपुढे-बालगंधर्वांपुढे! 'दहती बहु मना' मधला तो काळीज कापणारा तारषड्ज आणि 'सुजन कसा मन चोरी' मधला तो गंभीर गांधार! हे स्वरवैभव पाहिलं म्हणजे परतत्त्वाचा स्पर्श झालेली कला म्हणजे काय, या गोष्टीचा प्रत्यय येतो. अर्थात हे स्वरज्ञान आणि शब्दपांडित्य नंतरचं! त्या वयात या परतत्त्वाचा प्रत्यय आला तो त्याच्या निसर्गदत्त स्वरप्रतिभेमुळेच! परतत्त्वाला स्पर्श करणारी कला ही केव्हाही मानवी सामर्थ्यापलीकडची असते. 'मूकं करोती वाचालं, पङ्गुं लङ्घयते गिरिं शक्ती अशाच दैवी कलेत सामावलेली असते.

त्यानंतर बालगंधर्वांचं निकटचं दर्शन घडलं ते लो. टिळकांच्या जन्मशताब्दीच्या वेळी! एके दिवशी भल्या सकाळी ते आले आणि 'देवा,

मी आज इथे गाणार- माझ्या मायबापांच्या घरी!' असं त्यांनी जाहीर करून टाकलं. लोकमान्यांचं गणगोत मला चांगलंच माहीत होतं. बालगंधर्वांनी 'नाईटहूड' नाकारली होती आणि लोकमान्यांनी दिलेली 'बालगंधर्व' ही पदवी स्वीकारली होती, ही गोष्ट मी आमच्या परिसरातील परिवारात वारंवार ऐकलेली होती. जयवंतराव टिळकांनीही आपल्या त्या वेळच्या भाषणात या गोष्टीचा आवर्जून उल्लेख केला होता. त्या दिवशी रात्री त्यांचा आवाजही चांगला लागला आणि त्यांचा कार्यक्रमही चांगला रंगला. सारे प्रेक्षक भक्तिभावानं डोलत होते. 'देवाच्या घरचा' कार्यक्रम चांगला झाला याबद्दल त्यांनी स्वतःच धन्योद्गार काढले आणि लोकमान्यांच्या पवित्र वास्तूचं स्तवन केलं. त्यांची परत पाठवणी करताना आमच्या व्यावहारिक पद्धतीनं मी त्यांना वाहनखर्च देऊ केला. माझ्याकडे न बघताच खालमानेनं सद्गदित स्वरांत ते म्हणाले, ''अन्नदात्याच्या घरी गायलो. सेवा झाली. देवाकडून पैसे का घ्यायचे असतात?'' बोलताना कंठ दाटून आला. पाणीदार डोळे पाणावले. कृतकृत्य झाल्याच्या समाधानात 'मंदिरा'तून परतले. असंख्य रसिकांचं मन चोरून 'सुजन' घरी निघून गेला. रसिकांच्या मनावरचं अधिराज्य कायम होतं. रसिकांच्या दिलाचा कलिजा अवचित आला आणि वेड लावून गेला, असा प्रकार घडला. त्या रात्री माझ्या मनात 'सुजन कसा मन चोरी' या नाट्यगीतानं नुसता पिंगा घातला होता. आजवर लाखो रसिक त्यांच्या गाण्यावर 'वेडे' बनले होते, ते वेडे थोडेच होते? वेड लावणारी कला ही अशीच असते. रसिक तरी बिचारे काय करतील?

१९६४ सालच्या प्रारंभी बालगंधर्वांच्या अमृत महोत्सवाच्या निमित्तानं मी त्यांना 'केसरी'च्या वतीनं जाऊन भेटलो. त्याच वेळी प्रसिद्ध रसिकाग्रणी श्री. रामूभय्या दाते यांचीही भेट झाली. 'बालगंधर्व हे महाराष्ट्राला पडलेलं एक गोड स्वप्न आहे,' अशा शब्दांत रामूभय्यांनी बालगंधर्वांचं चित्र रेखाटलं. परंतु महाराष्ट्राच्या वैभवशाली रंगभूमीवर जे सर्वांगसुंदर स्वप्न उणीपुरी पन्नास वर्षं उभं होतं, ते स्वप्न त्या वेळी भंगलं होतं, विकलांग अवस्थेत स्वरपंजरी पडलं होतं. त्या वेळी बालगंधर्वांकडे पाहून माझ्या मनात विचार येत होता, जणू शरदातील पौर्णिमेच्या चंद्राची कला दिवसेंदिवस उणी होत आहे. जणू वसंतातील कोकिळेचा कंठ हळूहळू लुप्तप्राय होत चालला आहे.

त्याच वेळी रामूभय्या मला सांगत होते, ''अरे भय्या, नारायणरावांच्या साध्या शब्दात संगीताची लय आहे. खोटं नाही भय्या! 'एकच प्यालातील सिंधू जेव्हा शेवटी म्हणते, 'मला मांडीवर घ्यायची' तेव्हा नारायणरावांच्या शब्दांतील संगीताची जाणीव होते; आणि त्यांचे ते शब्द अंतःकरणाला जाऊन भिडतात; व अश्रूंचं रूप घेऊन ते डोळ्यांवाटे बाहेर पडतात. नारायणरावांच्या वाणीत जशी जादू आहे, तशी त्यांच्या डोळ्यांतही हिऱ्याची चमक आहे. अरे, नारायणरावांचा डोळा बोलतो. 'प्रभु अजि गमला' हे त्यांचं गाणं तुम्ही ऐकलं आहे का? हे त्यांचं गाणं प्रथम ऐकलं तेव्हा वाटलं, की हिऱ्याच्या तेजानं त्यांचे डोळे प्रकाशित झाले आहेत. त्या वेळी त्यांचा कंठ नाही गायला; डोळा गायला भय्या!''

एवढं सांगून एखाद्या गोष्टीचा निष्कर्ष काढावा त्याप्रमाणे रामूभय्या मला म्हणाले, ''या माणसाचं नाटक हे सत्य आहे; आणि त्याचं इतर जीवन हा भास आहे!''

रामूभय्याचं म्हणणं मला एकदम पटलं. एका साध्या सूत्रांत या महान कलावंताचं जीवन त्यांनी गोवलं होतं. नाही तर रंगभूमीवर एखाद्या सम्राटाप्रमाणे वावरणाऱ्या या कलावंताची ही दयनीय अवस्था झालीच नसती. त्यांचं आत्मचरित्र 'सह्याद्री' साठी घेण्याचं घाटत होतं. आत्मचरित्राचा विषय साहजिकच निघाला. मी सहज विचारलं, ''आपल्याला लोकमान्यांनी 'बालगंधर्व' ही पदवी नेमकी केव्हा दिली? कारण त्या बाबतीत वेगवेगळे लोक वेगळं वेगळं सांगतात.''

त्यांचं कथन सुरू झालं. मिरजचा एक प्रसंग ते सांगू लागले. सांगता सांगता रंगू लागले; पण एवढ्यात गोहरबाई मध्ये पडल्या. रंगाचा बेरंग झाला. रसिकांचा रसभंग झाला; पण त्या माउलीला त्याचं काहीच सोयरसुतक दिसलं नाही. गोहरबाई म्हणाल्या, ''नानांचं म्हणणं खरं नाही. त्यांना काही आठवत नाही. मी सांगते तो प्रसंग!'' असं म्हणून त्या सांगूही लागल्या. पण माझं लक्ष नव्हतं. मी बालगंधर्वांकडे नुसतं बघितलं. ते केविलवाण्या स्वरात म्हणाले, ''खरंच मला काही आठवत नाही. बाबा सांगतील तेच खरं आहे. माझं आत्मचरित्र त्याच लिहून घेत आहेत!''

म्हणजे नारायणरावांचं 'आत्मचरित्र' गोहरबाई लिहिणार! काळ फिरला म्हणजे सारंच फिरतं. प्रेमात सर्व काही क्षम्य असतं हेच खरं! त्या दिवशी

बालगंधर्वांचा निरोप घेऊन मी बाहेर पडलो तेव्हा चंद्र माथ्यावर आला होता; आणि चंदेरी दुनिया एखाद्या सुखद स्वप्नाप्रमाणे भासत होती. 'बालगंधर्व हे महाराष्ट्राला पडलेलं एक गोड स्वप्न आहे,' हे रामूभय्यांचे उद्‌गार मला पुनःपुन्हा आठवत होते आणि त्या चंदेरी पायघड्यांवरून मी त्या चंदेरी दुनियेतील स्वप्नांत वावरत होतो.

गोहरबाई गेल्यावर मी पुन्हा एकदा त्यांच्या आत्मचरित्राच्या मागावर गेलो होतो. शून्य दृष्टी लावून हा हरवलेला थोर कलावंत बसला होता. गोहरबाईंच्याविषयी मी दुःखप्रदर्शन केलं. इलाजच नव्हता. काही तरी बोलायचं म्हणून बोलून गेलो, ''आपलं गाणं कुणी घेतलं नाही, याचं फार फार वाईट वाटतं!''

डोळे क्षणभर चमकून गेले. म्हणाले, ''गोहरबाबांनी माझं गाणं जसंच्या तसं उचललं होतं. गोहरबाबा गेली. बरोबर माझं गाणं घेऊन गेली!''

माझ्या मतप्रदर्शनाचा प्रश्नच नव्हता. तो विषय पुढे चालू ठेवणं शक्य नव्हतं. मी हळूच ताकाचं भांडं पुढे केलं. म्हणालो, ''आपलं आत्मचरित्र केवढं होईल?''

माझ्याकडे बघत बालभावानं म्हणाले, ''खूप मोठं होईल! साठ-सत्तर पानं!''

गाडी रूळावरून पार घसरली होती. मनात विचार आला, 'या थोर कलावंताल फक्त स्वरांचं गणित जमलं होतं; आपल्या चरित्राचं गणित याला कधीच जमलेलं नव्हतं!'

माझी पत्नी गाते. 'गंधर्व गाणी' हा कार्यक्रम तिनं बसवावा, अशी कल्पना निघाली होती. त्याच भेटीत मी ती कल्पना बालगंधर्वांसमोर मांडली. म्हणाले, ''माझ्याकडे आणा त्यांना! सारी गाणी शिकवीन!''

हे बोलताना साधा गद्य स्वरही गळ्यातून नीट उमटत नव्हता. याच गळ्यात एके काळी गद्य-पद्यांच्या सीमारेषा एकजीव होऊन गेल्या होत्या. नाटकांतील गद्य-संवाद उच्चारले म्हणजे प्राजक्ताच्या फुलांचा सडा पडावा, असा भास होई आणि स्वरांना मोगरीचा मधुर सुगंध प्राप्त होई. एके काळी स्वरसुवर्णाला सुगंध येई; पण आता स्वरसुवर्णही गेलं होतं आणि सुगंधही परागंदा झाला होता.

मी त्यांचा निरोप घेतला तेव्हा पुन्हा म्हणाले, ''आणा बरं तुमच्या

पत्नीला!

मी जरूर सांगेन त्यांना!''

सांगण्याची शक्ती गेली म्हणजे माणूस यापेक्षा दुसरं काय सांगणार?

आणि चमत्कारिक योगायोग असा, की नंतर त्यांना सुमारे तीन-सव्वातीन महिन्यांनी बेशुद्धावस्थेतच पुण्याला आणलं. कुणी तरी कल्पना काढली, की नारायणरावांचा स्वर हरवला आहे. तो स्वर सापडला म्हणजे नारायणराव शुद्धीवर येतील. त्यांच्या रुग्णशय्येसन्निध स्वरआळवणी सुरू झाली. माझ्या पत्नीनंही त्यांच्या रुग्णशय्येजवळ बसून दोन अभंग म्हटले आणि अप्पासाहेब फडके यांनीही जवळ जाऊन त्यांच्या कानांत हाक मारली, ''नारायणराव मी आलोय!''

परंतु अप्पासाहेबांच्या ओळखीच्या आवाजानं ओळख पटली नाही किंवा पत्नीच्या अभंगगायनानं त्यांचा हरवलेला स्वर सापडला नाही. ते केविलवाणं दृश्य पाहून मी तेथून बाहेर पडलो आणि का. न. केळकर यांच्याशी बालगंधर्वांच्या दशमातील मंगळाबद्दल चर्चा करीत बसलो. कोणाही ज्योतिष्याशी बोलताना नारायणरावांच्या पदरात आम्ही आणखी दहा-पाच वर्षं आयुष्य टाकीत असू; कशाला कुणास ठाऊक! त्यांच्या हालअपेष्टा अशाच चालू ठेवून आम्हाला काय मिळणार होतं? पण आशा आहे तर आयुष्य आहे, याच आशेनं बालगंधर्वांना लागणाऱ्या एका दुर्मिळ औषधाची मी गृहमंत्री यशवंतराव चव्हाणांकडे मागणी केली. त्यांनीही ते औषध विमानानं ताबडतोब पाठवून दिलं. पण औषधाच्या त्या विमानाबरोबर वैकुंठीचं विमानही लगबगीनं येत होतं. आशा व्यर्थ ठरणार होती.

तब्बल शंभर दिवसांच्या बेशुद्धावस्थेनंतर स्वर्गीय स्वर शांत झाला. तेजात तेज निमालं. जिकडचं तिकडे निघून गेलं. त्यांच्या निधनाची दुःखद वार्ता मी आकाशवाणीवरून ऐकली नाही. मला ती ऐकायचीच नव्हती. माझ्या मनावर फार पूर्वी मुद्रित केलेली ध्वनिमुद्रिका वाजू लागली – 'सुजन कसा मन चोरी-'

◆





# अभिप्राय

एकनाथ आव्हाड यांचे 'खळाळता अवखळ झरा आणि इतर कथा' हे मार्च २०२२मध्ये प्रकाशित झालेले पुस्तक म्हणजे मुलांसाठी लिहिलेल्या सोळा कथांचा संग्रह आहे. या कथा ओघवत्या शैलीत, दैनंदिन जीवनातील प्रसंग आणि घटना यांतून फुललेल्या आहेत. शिक्षक-पालक-बालक असे सगळेजण कधी बरोबर, कधी चुकीचे वागतात असे ते सहज सांगतात. काय योग्य-काय अयोग्य हे कथनाच्या ओघात कळून जाते. मात्र त्या कथा उपदेशाचे डोस पाजत नाहीत. त्या सगळ्यांशीच हितगुज करतात. म्हणून त्या शिक्षक-पालक-बालक, तिघांनाही जवळच्या आहेत.

जीवनात आसपास दिसणाऱ्या कितीतरी व्यक्ती, व्यवसाय, प्रसंग या कथांमधून चित्रित झाले आहेत. त्यात मुंबईच्या मुलांनी मामाच्या खेडेगावी जाऊन केलेली मौज आहे. तेथे भेटलेल्या सर्कसमधील विदूषकाची आगळीवेगळी कहाणी आहे. पितळेच्या भांड्यांना कल्हई करणारा कल्हईवाला आहे. कल्हईवाल्याचा आठवीत शिकणारा आणि वडिलांना कल्हईच्या कामात मदत करणारा प्रामाणिक मुलगा आहे. फाटक्यातुटक्या खोपटात राहणारी, कोवळ्या वयाची मुलगी आहे. तिला मदत करणारे सुखवस्तू घरातील पिता-पुत्री आणि शिक्षक आहेत. पोटासाठी पक्षी विकणारा पारधी आहे. मोटारी धुण्याचे काम करून शाळा शिकणारा

मुलगा आहे. चित्रकलेवर प्रेम करणारे शिक्षक आणि विद्यार्थी आहेत. आईला शिकायचा आग्रह करणारी शाळकरी मुलगी आहे.




दोन कथांचा खास उल्लेख केला पाहिजे. त्या कथा ‘मराठी भाषा’विषयक आहेत. मराठी भाषेचे वैभव असलेल्या म्हणी दिवसेंदिवस लोप पावत आहेत, अशी आपणा सगळ्यांनाच खंत वाटते. त्या म्हणी रोजच्या प्रचारात आल्या पाहिजेत, असे सर्व मराठीप्रेमींना वाटते. एकनाथ आव्हाड यांनी त्यासाठी प्रत्यक्ष पाऊल उचलले आहे. त्यांनी म्हणी मुलांपर्यंत पोचण्यासाठी एक छान कथा सांगितली आहे. त्या कथेचे नाव आहे, ‘म्हणींची गंमत, गप्पांची संगत.’

त्या कथेत मुली म्हणींचा खेळ खेळतात. प्रत्येकीने तिच्यावर राज्य येताच एक म्हण सांगायची आणि तिचा अर्थही सांगायचा, असे ठरते. मग आणखी तपशील ठरतो. जिच्यामध्ये संख्येचा वापर आहे,अशी म्हण सांगायची. मग म्हणी सांगितल्या जाऊ लागतात : पळसाला पाने तीनच, चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे, झाकली मूठ सव्वा लाखाची, पाचामुखी परमेश्वर अशा कित्येक म्हणी त्या कथेत पुढे येतात आणि वाचकाला जाणवते की केवळ आकडे असलेल्या किती म्हणी आहेत मराठीमध्ये! या छोट्या म्हणी मोठा आशय व्यक्त करतात. असे आणखी वर्गीकरण करायला हवे. शरीराच्या अवयवांचा उल्लेख असलेल्या म्हणी, उदाहरणार्थ : कानामागून आली, तिखट झाली. खाद्यपदार्थांचा उल्लेख असलेल्या म्हणी. उदाहरणार्थ नावडतीचं मीठ अळणी. दुसरी कथा आहे ‘भाषेची गोडी’ त्यात निरनिराळ्या पशु-पक्ष्यांच्या आवाजाला काय म्हणतात, ते सांगितले आहे. वाघाची डरकाळी, सिंहाची गर्जना, माकडाचा भुभु:कार इत्यादी. शमी सर्व वहीत लिहून घेते. बाळू सर्वांवर रचलेली स्वत:ची कविता म्हणून दाखवतो. त्यात गाईचे हंबरणे, बैलाचे डुरकणे, मोराचा केकारव, हंसाचा कलरव इत्यादी बरेच काही आहे. मुक्या जिवांच्या सृष्टीतील ध्वनींना असे निरनिराळे शब्द असणे हेही मराठीचे वैभव

असल्याचे लेखकांनी मुलांना आवर्जून सांगितले आहे.

सध्या सर्वत्र बोलले जाते की घरीदारी माणसामाणसांतला संवाद कमी झाला आहे. मुले-मुली तर सतत मोबाइलमध्ये तोंड खुपसून असतात. एकनाथ आव्हाड यांच्या या दोन पुस्तकांतील कथांमध्ये एका जिव्हाळ्याच्या कुटुंबाचे चित्र आले आहे. शमी-बाळू हे बहीण-भाऊ आणि त्यांचे आई-वडील काम आणि अभ्यास आटोपल्यावर एकमेकांशी गप्पा मारतात. कधी-कधी शेजारी राहणारी माणसेही त्या गप्पांत सामील होतात. रविवारी वडील आणि मुले स्वयंपाकात आईला मदत करतात. पावसाच्या कविता आठवतात. वडील कवींविषयी माहिती देतात. टोपणनावाने लिहिणाऱ्या कुसुमाग्रज, बालकवी इत्यादींची मूळ नावे सांगतात. ते कुटुंब कधी टीव्ही पाहताना दिसत नाही, व्हॉटसअ‍ॅप-फेसबुकवर दिसत नाही. शाळेत काय काय होते ते मुले आई-वडिलांना सांगतात. वडील मुलांना गोष्टी सांगतात. सुटीच्या दिवशी सर्व कुटुंब सई परांजपे यांचे मुलांसाठीचे नाटक बघण्यास जाते. घरकामामुळे आई आधी येण्यास तयार होत नाही; पण काम बाजूला सारून तिला आग्रहपूर्वक नेले जाते. ते कुटुंब आजचे वास्तव चित्र आहे, असे म्हणता येत नाही; पण लेखकाने 'आदर्श कुटुंब' कसे असावे, याचे चित्र फार सहजपणे रेखाटले आहे. कथा कधी आई सांगते, कधी वडील सांगतात, कधी बाळू सांगतो. त्यामुळे वाचणाऱ्या मुलांना गंमत वाटते. फाल्गुन ग्राफिक्सने केलेले मुखपृष्ठ आणि आतील चित्रे यामुळे पुस्तकाचे दृश्यरूप आकर्षक झाले आहे.

या सोळा कथा शिक्षण-शाळा, श्रमजीवी माणसे, निसर्ग, मराठी भाषा यांविषयी मुलांच्या मनात जवळीक आणि सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणाऱ्या आहेत.

**– विनया खडपेकर**


संपादिका, राजहंस प्रकाशन

◆

## नवी संहिता... नवा आशय...

# आनंद जन्मला

**भा. द. खेर**




मुकुंदा आणि सुनंदाचा पौर्णिमेच्या चंद्रासारखा परिपूर्ण संसार... चंद्राला या लागलं ग्रहण... अन्...?

**किंमत : १४०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# रिगेटा

**भा. द. खेर**




योगायोग, नियती, मानवी मन, स्त्री-पुरुष, कला आणि जीवन यांचा कोलाज... मानवी जीवनाचे दर्शन घडवी खास

**किंमत : ३३०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

**१६ एप्रिल ते १५ मे २०२४ दरम्यानचा दिनविशेष**

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३० एप्रिल दरम्यान खास सवलत**

**१७ एप्रिल - शशिकांत वामन काळे यांचा जन्मदिन**
'मगरडोह' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-**

---

**१८ एप्रिल - मीरा सिरसमकर यांचा जन्मदिन**
'हसाल तर वाचाल', 'खुलदाबादचा खजिना', 'नोबेल ललना भाग-१', 'नोबेल ललना भाग-२' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ५१०/- । सवलत किंमत २९९/-**

---

**१९ एप्रिल - पारू नाईक यांचा जन्मदिन**
'मी का नाही ?', 'मोहिनी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३८०/- । सवलत किंमत १९९/-**

---

**१९ एप्रिल - जिन ली लेथम यांचा जन्मदिन**
'आगे बढो' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-**

---

**२० एप्रिल - अजय पांडे यांचा जन्मदिन**
'रेझोनान्स' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-**

---

**२० एप्रिल - सेबॅस्टिअन फॉक्स यांचा जन्मदिन**
'डेव्हिल मे केअर' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १४९/-**

---

**२० एप्रिल - झियाउद्दीन युसफझाई यांचा जन्मदिन**
'लेट हर फ्लाय' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३९/-**

---

**२१ एप्रिल - ज्ञानदा नाईक यांचा जन्मदिन**
'तजेलदार कॅनव्हास', 'गोष्ट डॉट कॉम भाग १', 'गोष्ट डॉट कॉम भाग २', 'गोष्ट डॉट कॉम भाग ३' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २०३५/- । सवलत किंमत १४२५/-**

**२१ एप्रिल - मार्क ट्वेन यांचा जन्मदिन**

'हकलबेरी फिनची साहसं', 'टॉम सॉयरची साहसं', 'मार्क ट्वेनच्या निवडक कथा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०१५/- । सवलत किंमत ६६०/-**

**२१ एप्रिल - ॲलिस्टर मॅक्लीन यांचा जन्मदिन**

ॲलिस्टर मॅक्लीन यांच्या १४ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४५९०/- । सवलत किंमत ३२१३/-**

**२१ एप्रिल - डॉ. सुवर्णा नाईक निंबाळकर यांचा जन्मदिन**

'करवीर छत्रपती इंदुमती राणीसाहेब', 'ज्ञानाई सावित्रीबाई फुले' या पुस्तकांवर विशेष सवलत

**मूळ किंमत ५६०/- । सवलत किंमत ४२०/-**

**२२ एप्रिल - चेतन भगत यांचा जन्मदिन**

'फाइव्ह पॉइंट समवन', 'द थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाईफ', 'वन नाईट@ द कॉल सेंटर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७२०/- । सवलत किंमत ४९९/-**

**२२ एप्रिल - डॉ. बाळ फोंडके यांचा जन्मदिन**

बाळ फोंडके यांच्या १६ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३७७५/- । सवलत किंमत २८७२/-**

**२३ एप्रिल - यशोधरा काटकर यांचा जन्मदिन**

'बंजाऱ्याचे घर', 'थर्ड पर्सन', 'अपूर्व, अलौकिक, एकमेव...', 'कमबख्त निंदर या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ९००/- । सवलत किंमत ६३०/-**

**२३ एप्रिल - जागतिक इंग्लिश भाषा दिन**

'EASY ENGLISH GRAMMAR AND COMPOSITION', 'A Methodical English Grammar', 'Fifty Essays' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७५५/- । सवलत किंमत ४६९/-**

**२३ एप्रिल - जागतिक पुस्तक दिवस**

५००० च्या खरेदीवर ४०% सवलत. नेट ३००० ची खरेदी बंधनकारक. एका पुस्तकाची एक प्रत.

**सवलत एक दिवसाकरिता मर्यादित.**

---

**२४ एप्रिल - विल्यम शेक्सपिअर यांचा जन्मदिन**

विल्यम शेक्सपिअर यांच्या २२पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १५००/- । सवलत किंमत १२७५/-**

---

**२४ एप्रिल - सचिन तेंडुलकर यांचा जन्मदिन**

'चेस युअर ड्रीम्स', 'प्लेइंग इट माय वे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ९९०/- । सवलत किंमत ६९३/-**

---

**२४ एप्रिल - कल्याणीरमण बेन्नूरवार यांचा जन्मदिन**

'अग्निदिव्य', 'तरंग' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७४५/- । सवलत किंमत ४७९/-**

---

**२४ एप्रिल - विला कॅथर यांचा जन्मदिन**

'देवाची माणसे' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १९९/-**

---

**२८ एप्रिल - ए. जी. कृष्णमूर्ती यांचा जन्मदिन**

'धीरुभाईझम', 'असामान्य यशप्राप्तीसाठी दहा सामान्य सूत्रे', 'प्रतिकूलतेवर मात' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३५५/- । सवलत किंमत २१३/-**

---

**२९ एप्रिल - राजा रवि वर्मा यांचा जन्मदिन**

'राजा रवि वर्मा' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत २१९/-**

---

**३० एप्रिल - अरुण शेवते यांचा जन्मदिन**

'चित्तचित्रे', 'मद्य नव्हे, हे मंतरलेले पाणी!', 'रंगल्या रात्री', 'रात्ररंग', 'साहेब संध्याकाळी भेटले...', 'स्वप्नी जे देखिले' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ११८५/- । सवलत किंमत ६९९/-**

---

**३० एप्रिल - जॉन बायेन यांचा जन्मदिन**

‘द बॉय इन द स्ट्राइप्ड पायजमाज्’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

**खालील संचांवर १मे ते १५ मे दरम्यान खास सवलत**

**४ मे - रॉबिन कुक यांचा जन्मदिन**
रॉबिन कुक यांच्या १३ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ५२६५/- । सवलत किंमत ३४२२/-**

**४ मे - डॉ. एस. आर. देशपांडे यांचा जन्मदिन**
‘भारतीय शिल्पवैभव’, ‘भारतीय गणिका’, ‘मराठेशाहीतील मनस्विनी’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ५९०/- । सवलत किंमत ३२९/-**

**७ मे - रवींद्रनाथ टागोर यांचा जन्मदिन**
रवींद्रनाथ टागोर लिखित ६ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ८७०/- । सवलत किंमत ६२८/-**

**८ मे - ध्रुव भट्ट यांचा जन्मदिन**
ध्रुव भट्ट लिखित ७ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १८३०/- । सवलत किंमत १३२९/-**

**८ मे - द. ता. भोसले यांचा जन्मदिन**
‘ग्रामीण बोलीचा शब्दकोश’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २६०/- । सवलत किंमत १५६/-**

**११ मे - कल्पना कुलश्रेष्ठ यांचा जन्मदिन**
‘इ.स.२५९५’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १५९/-**

**१२ मे - मदर्स डे**

**संच १ :** ‘चिकन सूप फॉर द मदर्स सोल भाग १,२,३’, ‘चिकन सूप फॉर द सोल : इंडियन मदर्स’, ‘आजीच्या पोतडीतल्या गोष्टी’, ‘करुणाष्टक’
**संचाची मूळ किंमत १२१५/- । सवलत किंमत ७९०/-**
**संच २ :** ‘रुचिरा भाग-१ व भाग-२’, ‘जिच्या हाती पाळण्याची दोरी’..., ‘गर्भसंस्कार’, ‘एक सांगू?’

**संचाची मूळ किंमत १४००/- । सवलत किंमत ९१०/-**

**संच ३ :** 'सुखद मातृत्व', 'सुखद बालसंगोपन', 'माय डॉटर माय मदर', 'माझ्या लाडक्या लेकींसाठी'

**संचाची मूळ किंमत ८३०/- । सवलत किंमत ५४०/-**

**संच ४ :** 'कळेल का 'त्याला' आईचं मन?', 'माझ्या अम्मीची गोष्ट', 'एका मातेचा लढा', 'कुंती', 'नॉट विदाउट माय डॉटर', 'द मदर', 'माऊली' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २५४०/- । सवलत किंमत १६५१/-**

---

**१२ मे - डॉ. सुभाष दांडेकर यांचा जन्मदिन**

'चाळिशीनंतरची वाटचाल', 'वेदना आणि व्याधींसह चांगलं जीवन', 'व्याधिमुक्त' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८५०/- । सवलत किंमत ५७९/-**

---

**१२ मे - सुप्रिया वकील यांचा जन्मदिन**

'हाऊज दॅट!', 'पॉपकॉर्न', 'उत्सव' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५२०/- । सवलत किंमत ३६४/-**

---

**१३ मे - आर. के. नारायण यांचा जन्मदिन**

'हलवाई', 'वडाच्या झाडाखाली आणि इतर कथा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत ३८५/-**

---

**१३ मे - डॅफने द्यू मोरियेर यांचा जन्मदिन**

'जमेका इन', 'माय कझिन रेशेल', या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत २९९/-**

---

**१४ मे - संभाजी महाराज जयंती**

'संभाजी', 'छ. संभाजी : एक चिकित्सा', 'छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ', 'युवराज संभाजीराजे आणि सती गोदावरी', 'छावा' (नाटक व कादंबरी) या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३३१५/- । सवलत किंमत २४८६/-**

◆


आवर्जून वाचावे असे काही



लीना सोहोनी

# अनुवादातून अनुसर्जनाकडे

दोन भाषांचा संगम घडविणाऱ्या अनुवादाची तंत्रे आणि मंत्रे स्पष्ट करणारा अमूल्य साहित्यिक ऐवज...





ebook available

**RNI. No. MAHMAR/2000/02739**
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/04/2024 Posting Date : 11/04/2024


## आवर्जून वाचावे...





























**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,